RNI NO. MAHMAR/2021/81364

सायंदैनिक

EVENING DAILY
SOLAPUR SANCHAR NEWS

# सोलापूर संचार न्यूज

■ वर्ष ४ थे ■ अंक १०७ ■ गुरुवार १२ डिसेंबर २०२४ ■ मराठी ■ सायं दैनिक ■ सोलापूर ■ पान : ८ ■ किंमत ३ रुपये
■ Vol 4 ■ Issue no 107 ■ Thursday 12 December 2024 ■ Marathi ■ Evening Daily ■ Solapur ■ Page : 8 ■ Price : Rs. 3/-

# भारताचे स्वत:च्या मालकीचे स्पेस स्टेशन!


## केंद्रीय मंत्री जितेंद्र सिंह यांची घोषणा

नवी दिल्ली-भारताचे अंतराळ संशोधन अधिक व्यापक करण्यासाठी 'भारतीय अंतराळ स्थानक' बांधण्यात येणार आहे. हे अंतराळ स्थानक अंतिम मंजुरी आणि अभियांत्रिकी टप्प्यात असून २०३५ पर्यंत ते बांधून पूर्ण करण्याचे लक्ष्य आहे. यासंदर्भात केंद्रीय विज्ञान आणि तंत्रज्ञान आणि अंतराळ राज्यमंत्री जितेंद्र सिंह यांनी महत्त्वाची माहिती दिली आहे.

विज्ञान मंत्रालयांच्या कामगिरीवर दिल्लीत पत्रकार परिषदेत बोलताना सिंग यांनी सरकारच्या महत्त्वाकांक्षी अंतराळ उपक्रमांवर प्रकाश टाकला. आमचे स्वतःचे अंतराळ स्थानक असणार आहे, अमेरिका आणि एक-दोन देशांनंतर भारताचं स्थानक असेल. २०३५ पर्यंत ते भारत अंतरीक्षा स्थानक म्हणून ओळखले जाईल. आणि २०४० पर्यंत, आम्ही कदाचित चंद्रावर लँडिंग करू.

२०२४ च्या अखेरीस किंवा २०२६ च्या सुरुवातीला गगनयान महिमेअंतर्गत पहिला भारतीय अंतराळवीर अंतराळात जाणार आहे, असंही त्यांनी सांगितलं. तसंच, भारताने खोल समुद्र मोहिमेचा भाग म्हणून ६ हजार मीटरपर्यंत खोली शोधून समुद्रतळावर मानव पाठवण्याचीही यजना आखली असल्याचं त्यांनी सांगितलं.

सध्याच्या सरकारच्या काळात उपग्रह प्रक्षेपणात झालेल्या महत्त्वपूर्ण प्रगतीवरही त्यांनी भर दिला. ते म्हणाले, भारताने श्रीहरिकटा येथून ४३२ परदेशी उपग्रह प्रक्षेपित केले आहेत. त्यापैकी ३९७ म्हणजे जवळपास



९० टक्के गेल्या दशकात प्रक्षेपित केले गेले आहेत.

अंतराळ स्थानकाची निर्मिती का?

२०३० च्या अखेरीस आंतरराष्ट्रीय अंतराळ स्थानक सेवामुक्त होणार आहे. त्यामुळे भारतीय अंतराळ स्थानक आपल्या देशाला जागतिक लाभ देऊ शकतो. भारताचे अंतराळ स्थानक पाश्चिमात्य देशांमधील आमच्या मित्रराष्ट्रांना जागतिक संशोधन सहकार्यासाठी अवलंबून राहण्यासाठी एक महत्त्वाचे संसाधन प्रदान करेल, असे इस्रोच्या अधिकाऱ्यांनी सांगितले. 'बीएएस' पूर्णपणे स्वदेशी अभियांत्रिकीसह तयार केले जात आहे, परंतु आवश्यकतेनुसार संभाव्य जागतिक सहकार्याचा पर्याय भारताने खुला ठेवला आहे. आंतरराष्ट्रीय अंतराळ संस्था बंद होणार असल्याने 'बीएएस' अग्रगण्य व्यासपीठ म्हणून उदयास येईल, असा विश्वास संशोधकांना आहे.

अंतराळ स्थानकाची अर्थव्यवस्था कशी असेल?

अंतराळ संशोधन आणि विकास (आर अँड डी) सहकार्यामुळे बीएएसला भू-राजकीय महत्त्व प्राप्त होईल. पुण्याच्या फ्लेम विद्यापीठाच्या अंतराळ विज्ञानचे सहयोगी प्राध्यापक चैतन्य गिरी यांनी सांगितले की, 'बीएएस'ची अर्थव्यवस्था ही एक महत्त्वाची बाब असेल. भारताचे अंतराळ स्थानक लहान आकाराचे असेल आणि तेथे खासगी व्यावसायिक अंतराळ स्थानके उभारण्यात येणार आहेत. भारताचे स्वतःचे अंतराळ स्थानक वस्तू पुरवठादार, कपडे आणि इतर वस्तूंची अर्थव्यवस्था तयार करेल, ज्यामुळे देशांतर्गत आणि आंतरराष्ट्रीय अंतराळ कंपन्यांना संधी मिळू शकतील. शिवाय हे स्थानक भूराजकीयदृष्ट्या सहकार्यात्मक संशोधनासाठी महत्त्वाचे ठरेल, जेथे व्यावसायिक स्थानकांपेक्षा राज्य समर्थित अंतराळ स्थानक अधिक महत्त्वाचे असेल.

## 'नवरा आणि सासरच्या लोकांचा छळ करण्यासाठी कायद्याचा दुरूपयोग नको': सर्वोच्च न्यायालय

नवी दिल्ली- विवाह संबंधात पती-पत्नीमध्ये कौटुंबिक वाद झाल्यानंतर कायद्याचा दुरुपयोग करून नवरा आणि सासरच्या लोकांना त्रास दिला जातो, याची दखल सर्वोच्च न्यायालयाने घेतली असून महिलांनी वैयक्तिक सूड उगवण्यासाठी कायद्याचा दुरुपयोग करू नये, अशी टिप्पणी सर्वोच्च न्यायालयाने केली आहे. तेलंगणामधील एका व्यक्तीविरोधात त्याच्या पत्नीने भादंवि कलम ४९८ (अ) नुसार क्रूरतेची तक्रार दाखल केली होती. सदर गुन्हा रद्द करण्यास तेलंगणा उच्च न्यायालयाने नकार दिला. त्यानंतर हे प्रकरण सर्वोच्च न्यायालयात पोहोचल्यानंतर न्यायाधीश बीव्ही नागरत्न आणि एन. कोटीस्वार सिंह यांच्या खंडपीठासमोर सुनावणी झाली. ज्यामध्ये सर्वोच्च न्यायालयाने कायद्याच्या गैरवापराबद्दल नाराजी व्यक्त केली.

भादंवि कायद्यातील कलम ४९८ (अ) किंवा भारतीय न्याय संहिता (बीएनएस) कायद्यातील कलम ८६ नुसार विवाहित महिला तिचा पती आणि सासरच्या मंडळीकडून छळ झाल्यास त्याविरोधात दाद मागू शकते. या कायद्यानुसार आरोपीला तीन वर्ष किंवा त्यापेक्षा अधिकची शिक्षा होऊ शकते आणि आर्थिक दंडही बसू शकतो. तेलंगणाच्या प्रकरणात लग्न रद्द करण्यासाठी पतीने अर्ज दाखल केल्यानंतर पत्नीने छळवणुकीची तक्रार केली होती.या प्रकरणाची सर्वोच्च न्यायालयात सुनावणी घेत असताना खंडपीठाने सांगितले की, महिलेने आपल्या तक्रारीत कुटुंबातील काही केवळ सदस्यांची नावे सबळ पुराव्याशिवाय नमूद केली म्हणून त्यांच्यावर फौजदारी कारवाई करता येणार नाही. न्यायालयाने पुढे असेही म्हटले की, कलम ४९८ (अ) आणण्यामागचा हेतू असा होता की, पती आणि सासरच्या मंडळीकडून पत्नीचा होणारा छळ थांबावा. मात्र गेल्या काही वर्षांत संपूर्ण देशभरात कौटुंबिक वादाची प्रकरणे वाढत आहेत.

## सभापतींना हटवण्यावरून राज्यसभेत गोंधळ; सलग दुसऱ्या दिवशी सभागृहाचे कामकाज स्थगित

नवी दिल्ली- गेल्या दोन आठवड्यापासून दिल्लीत संसदेच्या दोन्ही सभागृहाचे हिवाळी अधिवेशन सुरू आहे. या दोन आठवड्याच्या काळात दोन्ही सभागृहांमध्ये सत्ताधारी आणि विरोधक विविध मुद्द्यांवरून गोंधळ घालत आहेत. अशात काल सत्ताधारी व विरोधकांनी घातलेल्या गोंधळामुळे दोन्ही सभागृहांचे कामकाज दिवसभरासाठी स्थगित करण्यात आले होते. त्यानंतर राज्यसभेचे सभापती जगदीप धनखड विरोधकांबरोबर भेदभाव करतात असा आरोप करत इंडिया आघाडीने त्यांच्याविरोधा अविश्वास प्रस्ताव दाखल केला आहे. दरम्यान आजही सभागृहात झालेल्या गोंधळामुळे राज्यसभेचे कामकाज दिवसभरासाठी स्थगित करण्यात आले आहे. दुसरीकडे लोकसभेतही झालेल्या गोंधळानंतर सभागृहाचे कामकाज दुपारी २ वाजेपर्यंत तहकूब करण्यात आले.

मोदी सरकारमधील मंत्री आक्रमक

दरम्यान संसदीय कामकाज मंत्री किरेन रिजेजू यांनी आज इंडिया आघाडीने राज्यसभेचे सभापती जगदीप धनखड यांच्याविरोधात आणलेल्या अविश्वास प्रस्तावार टीका केली आहे. शेतकऱ्याचा मुलगा देशाचा उपराष्ट्रपती झाला आहे, हे संपूर्ण देशाने पाहिले आहे. सभापतींच्या प्रतिष्ठेवर जर कोणी हल्ला करत असेल तर तो सहन करणार नसल्याचेही रिजेजू म्हणाले.

दुसरीकडे केंद्रीय मंत्री जेपी नड्डा यांनीही राज्यसभेत विरोधकांवर टीका केली. नड्डा म्हणाले, आमचे खासदार सोनिया गांधी आणि जॉर्ज सोरोस उठवत आहेत. हा देशाच्या संप्रभुतेचा विषय आहे. सभापतींच्या विरोधा अविश्वास प्रस्ताव आणून देशाच्या संप्रभुतेच्या मुद्यावरून नागरिकांचे लक्ष हटवण्याचा प्रयत्न आहे. सर्वांनी याचा निषेध केला पाहिजे. त्यांनी कधीच सभापतींचा सन्मान केला नाही.

विरोधकांकडून अणोख्या पद्धतीने निषेध

आज इंडिया आघाडीच्या खासदारांनी संसद परिसरात अणोख्या पद्धतीने सत्ताधाऱ्यांचा निषेध केला. यावेळी इंडिया आघाडीच्या खासदारांनी तिरंगा ध्वज आणि गुलाबाचे पुष्प देत भाजपाच्या खासदारांचे स्वागत केले. यावेळी विरोधकांनी भाजपाच्या खासदारांना दोन्ही सभागृहाचे कामकाज कामकाज सुरू ठेवण्याचे आणि अदाणींसह इतर सर्व मुद्द्यांवर चर्चा करण्याचे आवाहन केले. यावेळी काँग्रेसच्या सरचिटणीस प्रियांका गांधी वड्रा, काँग्रेस, द्रमुक, झारखंड मुक्ती मोर्चा आणि डाव्या पक्षांचे खासदार तिरंगा आणि गुलाब हातात घेऊन संसदेच्या पायऱ्यांवर उभे होते.

विरोधकांकडून मणिपूरचा मुद्दा

आज लोकसभेचे कामकाज सुरू झाल्यानंतर काँग्रेसचे खासदार गौरव गोगोई यांनी मणिपूरमधील परिस्थितीबाबत मुद्दा उपस्थित केला. ते म्हणाले, मणिपूरमध्ये जे काही घडत आहे त्यामुळे लोक त्रस्त आहेत, त्यांना मूलभूत सेवा मिळणे कठिण झाले आहे. त्यामुळे पंतप्रधान नरेंद्र मोदी मणिपूरला कधी भेट देणार आणि गृहमंत्री अमित शहा यांनी या परिस्थितीचा सामना करण्यासाठी काय पाऊले उचलणार आहेत याची सभागृहात माहिती द्यावी. सरकारचे अपयश लपवण्यासाठी भाजपा जॉर्ज सोरोसचा मुद्दा उपस्थित करत असल्याचा आरोपही त्यांनी केला.

## शैक्षणिक वर्षाची सुरुवात आता १ एप्रिलपासून करण्याची तयारी

### सुकाणू समितीची शासनाकडे शिफारस

सोलापूर, दि. १२- 'सीबीएसई'च्या पॅटर्नप्रमाणेच आता राज्य शासन देखील शाळांच्या शैक्षणिक वर्षाची सुरुवात १ एप्रिलपासून करण्याच्या तयारीत आहे. नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरण लागू करण्यासंदर्भात शालेय शिक्षण विभागाने नेमलेल्या सुकाणू समितीने तशी शिफारस राज्य शासनाला केली आहे.

२०२६-२७ पासून त्याची राज्यात अंमलबजावणी केली जाणार आहे. पण तत्पूर्वी शासनाचा अंतिम आदेश काढला जाणार आहे.

नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरणांतर्गत विद्यार्थ्यांच्या वयोगटानुसार बालवाडी ते इयत्ता दुसरीपर्यंत पहिला, तिसरी ते पाचवीपर्यंत दुसरा आणि नववी ते बारावीपर्यंत तिसरा टप्पा करण्यात आला आहे. इयत्ता नववीपासून विद्यार्थ्यांना एक स्थानिक भाषा व दुसरी देशातील कोणतीही किंवा परदेशी एक भाषा निवडता येईल. विषयांची मर्यादा कमी होणार असून विद्यार्थ्यांना त्यांच्या आवडीनुसार विषय निवडता येणार आहेत.

दरम्यान, सध्या 'सीबीएसई'च्या शाळांचे शैक्षणिक वर्ष ३१ मार्चला संपून नव्या शैक्षणिक वर्षाची सुरुवात १ एप्रिलपासून होते. त्यातून विद्यार्थ्यांना अभ्यासासाठी चांगला वेळ मिळणार असून अध्यापनाच्या तासांची वेळदेखील काही मिनिटांनी वाढविता येणार आहे. 'सीबीएसई'कडे विद्यार्थ्यांचा कल वाढल्याने आता राज्य शासन देखील गणित व विज्ञान हे दोन विषय 'सीबीएसई' प्रमाणेच ठेवणार आहे. यासाठी राज्याच्या सुकाणू समितीने मान्यता दिली असून आता याची अंमलबजावणी टप्प्या-टप्प्याने होणार आहे. सुरुवातीला २०२५-२६ पासून दुसरीपर्यंतचा अभ्यासक्रम बदलणार असून त्यानंतर २०३० पर्यंत संपूर्ण धोरण राज्यभर लागू होणार आहे.

## पाचाड येथील शिवसृष्टी उभारणीच्या प्रकल्पाला गती

अलिबाग : किल्ले रायगडाच्या पायथ्याशी शिवसृष्टी उभारण्याच्या प्रकल्पाला गती मिळणार आहे. प्रकल्प अहवाल तयार करण्यात आला असून तो मंजुरीसाठी राज्य सरकारकडे पाठवला जाणार आहे. राज्यसरकारच्या मंजूरीनंतर प्रत्यक्ष कामाला सुरूवात होणार आहे.

किल्ले रायगडाच्या पायथ्याशी ही शिवसृष्टी उभारण्यात येणार आहे. यासाठी ८० एकर जागेचे संपादन पूर्ण झाले आहे. ५० कोटींचा प्राथमिक निधी राज्यसरकारने दिला होता. त्यानुसार शिवसृष्टी उभारणीच्या कामांसाठी हालचाली सुरु झाल्या आहेत. अधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून ही शिवसृष्टी उभारण्यात येणार असून, किल्ल्याचा तसेच शिवाजी महाराजांच्या जाज्वल्य इतिहास या निमित्ताने किल्ल्यावर येणाऱ्या पर्यटकांना आणि शिवप्रेमींना अनुभवता येणार आहे. राज्यात विवीध ठिकाणी उभारण्यात आलेल्या शिवसृष्टींचा अभ्यास करून या प्रकल्पाचा आराखडा तयार करण्यात आला. ज्याचे सादरीकरण नुकत्याच पार पडलेल्या रायगड प्राधिकरणाच्या बैठकीत करण्यात आले. यानंतर शिवसृष्टीचा आराखडा अंतिम मंजूरीसाठी राज्यसरकारकडे पाठविण्याचा निर्णय घेण्यात आला.

संपादकीय

## ईव्हीएम वरून राजकारण तापले

विधानसभा निकाल लागल्यापासून विरोधकांकडून सतत संशय व्यक्त केला जात आहे. ईव्हीएममुळेच महायुतीचा मार्ग सोपा झाला आणि त्यांना सत्तेची खुर्ची मिळाली, अशी टीका विरोधक करीत आहेत. विरोधक आरोप करीत असतानाच जनसामान्यांमध्येही निकालाबाबत शंका व्यक्त केली जात आहे. म्हणूनच ईव्हीएमविरोधात राज्यातील वातावरण किती तापणार हे पाहावे लागेल. विधानसभा निवडणुकीच्या अनपेक्षित निकालानंतर विरोधकांनी ईव्हीएमला लक्ष्य केले आहे. असे असले तरी सहा महिन्यांपूर्वी लोकसभा निवडणुकीच्या काळातच केंद्रीय निवडणूक आयोगाने ईव्हीएममधील मतदान सुरक्षित असल्याचे स्पष्ट केले होते. एवढेच नाही तर विधानसभा निकालानंतर एका जनहित याचिकेवर सुनावणी करताना सर्वोच्च न्यायालयाच्या खंडपीठाने विरोधकांना कडक शब्दांत सुनावले होते. हरल्यानंतर ईव्हीएमला दोष आणि जिंकल्यावर मौन हे कसे, असा सवाल खंडपीठाने विचारला होता. म्हणजेच केंद्रीय निवडणूक आयोग आणि सर्वोच्च न्यायालयातून ईव्हीएमविरोधातील मुद्याला पूर्णविराम मिळालेला आहे. असे असले तरी ईव्हीएमविरोधातील संशयाचे काळे ढग दूर झालेले नाहीत. किंबहुना हा संशय दिवसेंदिवस वाढतच आहे. आता तर महाराष्ट्रातील दोन ग्रामपंचायतींनी ईव्हीएमविरोधात आवाज उठवल्यामुळे भविष्यात आणखी किती गावे, वाड्या पुढे येतील हे आताच सांगणे अवघड आहे, मात्र महायुती सरकारच्या मानगुटीवर ईव्हीएमचे भूत पाच वर्षे बसणार याचे स्पष्ट संकेत यातून गेले आहेत. मारकडवाडीतील मतदारांनी कुणाला मतदान केले हे तपासण्यासाठी ग्रामस्थांनी बॅलेट पेपरवर ३ डिसेंबर रोजी मतदान करण्याचे ठरवले होते. तशी तयारीही केली होती, मात्र जिल्हा प्रशासनाने ग्रामस्थांच्या या कृतीविरोधात पाऊल उचलले आणि मतदान होण्यापूर्वीच ते बंद पाडले. जिल्हा प्रशासनाच्या या कारवाईमुळे ग्रामस्थांचे समाधान न होता ईव्हीएमविरोधातील संशय आणखी वाढला आहे. त्यानंतर ज्येष्ठ नेते शरद पवार रविवारी मारकडवाडी गावात पोहचले. तेथे त्यांनी सभा घेऊन ईव्हीएमविरोधात भूमिका मांडली. त्यामुळे ईव्हीएमविरोधाचा मुद्दा तापलेलाच राहिला. सत्ताधार्यांसाठी ही धोक्याची घंटा असल्यामुळे त्यांनी हा मुद्दा शमवायचा प्रयत्न केला.

# पंढरपूरच्या धर्तीवर अक्कलकोटला सुविधा मिळाव्यात

## दत्त जयंतीच्या पार्श्वभूमीवर नियोजन करण्याची मागणी

अक्कलकोट, दि. १२- श्री स्वामी समर्थांच्या दर्शनासाठी दररोज वाढत चाललेल्या गर्दीमुळे स्थानिक प्रशासन हात टेकल्याने स्वामीभक्तांना नाहक त्रास होत आहे. शनिवार, १४ डिसेंबर रोजी श्री दत्त जयंती व पौर्णिमा असल्याने यादिवशी श्री स्वामी समर्थांच्या दर्शनासाठी लाखो भाविक श्रीक्षेत्र अक्कलकोटमध्ये येतात. या पार्श्वभूमीवर जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी पंढरपूरच्या धर्तीवर अक्कलकोट येथे दर्शनासाठी येणाऱ्या भाविकांना चांगल्या सेवा सुविधा मिळाव्यात याकरिता तातडीने उपाययोजना करण्याकरिता बैठक घ्यावी, अशी मागणी सकल स्वामीभक्तांतून होत आहे.

राज्यातला टॉप फाइव्हमधील तीर्थक्षेत अक्कलकोट असून श्री स्वामी समर्थांच्या दर्शनासाठी राज्यासह देश-विदेशातून वाढती भाविक संख्या पाहता राज्यातल्या अन्य तीर्थक्षेत्राप्रमाणे विकास होणे गरजेचा आहे. १९९५ ला तीर्थक्षेत्राचा दर्जा मिळाला. गेल्या २९ वर्षांत म्हणावा तसा विकास झालेला नाही.

राज्य शासनाकडून पंढरपूर, तुळजापूर, शिर्डी, शेगाव आदी ठिकाणाचा तीर्थक्षेत्र विकास निधी, यात्रा अनुदान पाहता आजतागायत निधीची श्रीक्षेत्र अक्कलकोटला कमतरता भासली आहे. नुकतेच राज्य सरकारकडून रुपये ३६८ कोटींचा निधी मिळालेला आहे. मात्र, तीर्थक्षेत्र विकास अंतर्गत घेण्यात आलेल्या कामांचे प्रस्ताव नगरपरिषदेकडून जिल्हाधिकारी यांच्या अंतर्गत असलेल्या जिल्हा पालिका शाखा यांच्याकडून राज्य शासनाकडे मंजुरी अंतिम टप्प्यात आहे.

विकास कामांना मंजुरी मिळेल हे जरी निश्चित असले तरी सध्याच्या परिस्थितीवर उपाययोजना करण्याकामी पालिका प्रशासनाकडून प्रयत्न व्हायला हवा. सण, वार, उत्सव, दर गुरूवारी, संकष्टी चतुर्थी, एकादशी, पौर्णिमा व सलग सुट्ट्यांच्या दिवशी प्रचंड भाविकांची गर्दी होत आहे. त्यामुळे श्री वटवृक्ष स्वामी महाराज देवस्थान, बुधवार पेठेतील समाधी मठ (चोळप्पा मठ), श्री गुरु मंदिर (बाळप्पा मठ) याठिकाणची भोगोलिक परिस्थितीमुळे स्वामीभक्तांना अनंत अडचणींना सामोरे जावे लागत आहे.

भाविकांना ज्या काही सुविधा द्यायच्या आहे, त्या सुलभ देण्याकामी पाऊले उचलावीत. यामध्ये परिसरातील अतिक्रमण काढण्यास प्राधान्य द्यावे. भक्तांना राहण्याकरिता प्रशासकीय सोयीसुविधा नाहीत. याबाबत जिल्हाधिकाऱ्यांनी गंभीर दखल घेणे गरजेचे आहे. पर्यटन विकास महामंडळाची प्रशस्त इमारत असून त्याला कबाड खाण्याचे स्वरूप आलेले आहे. ते जरी भक्तांच्या सेवेत असले असते तर निवासाची व्यवस्था मोठ्या प्रमाणात झाली असती. गर्दीमध्ये अनेक भाविकांना निवासाअभावी रात्र भर रस्त्यावर काढावी लागली आहे.

नुकतेच पर्यटन विकास महामंडळाच्या प्रशस्त इमारतीला आलेल्या कळाबाबत उपविभागीय अधिकारी तथा जिल्हा पर्यटन अधिकारी विठ्ठलराव उदमले हे असताना भेट देऊन पाहाणी केली. मात्र, अद्याप त्यावर कोणतीही कारवाई झालेली नाही. पंढरपूरप्रमाणे जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी श्रीक्षेत्र अक्कलकोट येथे देखील नगरपालिका, पोलीस प्रशासन, तहसीलदार, श्री वटवृक्ष स्वामी महाराज देवस्थान समिती, श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळ, समाधी मठ, राजेराय मठ, श्री गुरु मंदिर यांच्या माध्यमातून भाविकांना देण्यात येणाऱ्या सेवा सुविधांबाबत सातत्याने आढावा घेऊन संबंधित अधिकारी, पदाधिकारी यांना आवश्यक त्या सूचना देत प्रशासकीय यंत्रणा सतर्क ठेवणे आवश्यक असल्याचे भाविकांतून बोलले जात आहे.

**विकास होणे गरजेचे**

भाविकांसाठी सुलभ दर्शन व्यवस्था, वाहनतळ, शहर स्वच्छतेवर भर देणे आवश्यक आहे. स्थानिक व तरंगती लोकसंखेच्या अनुसंगाने तीर्थक्षेत्र अक्कलकोटचा विकास होणे गरजेचे आहे. दिवाळी सुट्टी ते त्रिपुरारी पौर्णिमेपर्यंत अक्कलकोटला येणाऱ्या भक्तांची संख्या ही २० लाखांहून अधिक असल्याचे प्रशासन सूत्राकडून सांगण्यात आले.

**निवासाची व्यवस्था करावी**

पर्यटन विकास महामंडळाच्या विश्रामगृहास जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी भेट देऊन पाहाणी करावी व लवकरात लवकर भक्तांना निवासाची व्यवस्था करण्यासाठी तत्काळ उपाययोजना करावी, अशी मागणी स्वामीभक्तांतून होत आहे.

## डीसीसी -वसुलीची नोटीस रवाना; संचालकांच्या भूमिकेकडे लक्ष

सोलापूर, दि. १२- जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेने २३८ कोटी ४३ लाख रुपयांच्या बेकायदेशीर कर्ज प्रकरणी जबाबदार धरलेल्या जिल्ह्यातील ज्येष्ठ नेत्यांसह ३२ माजी संचालक, दोन अधिकारी व एक चार्टड अकाउंटंट यांना नोटीस दिली असून नोटीसमध्ये नमूद रक्कम व्याजासह १५ दिवसांत भरावी, असे म्हटले आहे. आता ज्येष्ठ नेते काय भूमिका घेतात याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

जिल्हा मध्यवर्ती बँकेच्या अनियमित कर्ज वाटप प्रकरणाची चौकशी २०११ पासून सुरू आहे. बार्शीचे माजी आमदार राजेंद्र राऊत यांच्या याचिकेवर उच्च न्यायालयाने दिलेल्या आदेशानुसार कर्ज वाटपाची चौकशी कलम ७८, कलम ८३ व कलम ८८ अन्वये पूर्ण करण्यात आली आहे. सहकार खात्याचे अपर निबंधक किशोर तोष्णीवाल यांनी ८८ अन्वये चौकशी करुन बेकायदेशीर कर्ज वाटपाला ३२ संचालक, दोन अधिकारी व एक चार्टड अकाउंटंट अशा ३५ जणांना २००९ ते २०१४ या कालावधीत वाटप केलेल्या २३८ कोटी ४३ लाख ९९९ रुपये इतक्या कर्जाला जबाबदार धरण्यात आले आहे. ८८ चे आदेश मिळताच कलम ९८ अन्वये विभागीय सहनिबंधक योगिराज सुर्वे यांनी जिल्हा मध्यवर्ती बँकेला वसुलीचे आदेश दिले आहेत.

विभागीय सहनिबंधकांनी चौकशीत ८८ अन्वये निश्चित केलेल्या रकमेचा उल्लेख करीत नोटीसची प्रत जबाबदार धरलेल्या ३५ जणांना दिली आहे.

विभागीय सहनिबंधक सुर्वे यांच्या आदेशानुसार जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे मुख्य कार्यकारी अधिकारी तथा वसुली अधिकारी राजेंद्र शिंदे यांनी जबाबदार धरलेली रक्कम १२ टक्के व्याजासह १५ दिवसांत भरावी, असे संबंधितांना सांगितले आहे. वसुलीची नोटीस रवाना झाली असली तरी आता ज्येष्ठ नेते काय भूमिका घेणार हे नोटिसीची मुदत संपल्यानंतर म्हणजे २३ तारखेला समजणार आहे.

## 'ईव्हीएम हटवा, बॅलेट पेपर आणा': भाकप

गोंदिया : गोंदिया जिल्ह्यातील बहुजन रिपब्लिकन सोशालिस्ट पार्टी व आदिवासी गोवारी युवा शक्ती संघटनेच्या वतीने आज ११ डिसेंबर रोजी नवीन प्रशासकीय इमारतीत असलेल्या तहसील कार्यालयासमोर ईव्हीएम काढून मतपत्रिका आणण्यासाठी आंदोलन करण्यात आले. ज्यामध्ये दोन्ही संघटनांचे कार्यकर्ते मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

बहुजन रिपब्लिकन सोशालिस्ट पार्टीचे संस्थापक अध्यक्ष अधिवक्ता सुरेश माने यांच्या मार्गदर्शनाखाली झालेल्या या आंदोलनानंतर त्यांच्या मागण्यांचे निवेदन तहसीलदारांना देण्यात आले. महाराष्ट्रात झालेल्या विधानसभा निवडणुकीत पैसा आणि बळाचा मोठ्या प्रमाणात गैरवापर झाल्याचे या प्रसंगी आंदोलकांनी सांगितले.

# डॉ.धवलसिंह मोहिते-पाटील यांनी आत्मपरीक्षण करावे

## राजीनाम्यावरून चेतन नरोटे यांचा टोला

सोलापूर, दि. १२- दुसऱ्यावर टीका करणाऱ्या डॉ.धवलसिंह मोहिते-पाटील यांनी आपण किती वेळा काँग्रेस भवनात आलो आणि काय काम केले, याचे आत्मपरीक्षण करावे, असा टोला काँग्रेसचे शहराध्यक्ष चेतन नरोटे यांनी लगावला.

धवलसिंह मोहिते-पाटील यांनी जिल्हा काँग्रेस कमिटी अध्यक्षपदाचा राजीनामा दिला. त्यांनी आपल्या राजीनामा पत्रात काँग्रेस पक्षाच्या कार्यपध्दतीवर गंभीर आरोप केले आहेत. या सर्व गोष्टींचा नरोटे यांनी समाचार घेतला आहे.

धवलसिंह हे आजपर्यंत अनेक पक्ष फिरून आले आहेत. वास्तविक पाहता ते भाजपमध्ये जाणार हे आम्हाला आठवडयापूर्वीच कळले होते. आपल्या राजकीय स्वार्थासाठी धवलसिंहांनी आजपर्यंत अनेक पक्ष बदलले आहेत. ते नेहमी सत्तेच्या बाजूने असणाऱ्या पक्षाकडे जातात. त्यांना कुठल्याही पक्षाशी काहीही देणे-घेणे नाही. माजी केंद्रीय गृहमंत्री सुशीलकुमार शिंदे यांना भेटून काँग्रेस पक्षात प्रवेश करण्याची इच्छा व्यक्त केली होती. त्यावेळी शिंदे यांनी त्यांना सन्मानाने जिल्हाध्यक्ष केले. शिंदे परिवाराने धवलसिंहांना कायम साथ दिली असताना पक्ष सोडून जाताना सन्मानाने न जाता शिंदे परिवाराबद्दल विष ओकून गेले. पद घेताना नेत्यांचे दहा वेळा हात-पाय जोडायचे आणि जाताना त्याच नेत्यांवर टीका करायची ही कुठली पध्दत आहे?, असा सवालही नरोटे यांनी उपस्थित केला आहे.

लोकसभा निवडणुकीच्या वेळी तत्कालीन उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना भेटून राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पार्टीचे उमेदवार धैर्यशील मोहिते-पाटील यांच्या विरोधात उघडपणे काम करत धवलसिंहांनी भाजपला मदत केली होती. तसेच नुकत्याच झालेल्या विधानसभा निवडणुकीत त्यांनी राम सातपुते यांचे काम करून महाविकास आघाडीच्या उमेदवाराच्या विरोधात प्रचार केला. त्यावेळी राष्ट्रवादीच्या व काँग्रेसच्या अनेकांनी त्यांना पक्षातून काढून टाकण्याची मागणी केली होती, हेही नरोटे यांनी निदर्शनास आणले.

हे सायं दैनिक वृत्तपत्र मालक, प्रकाशक **सपना विक्रम खेलबुडे** यांनी मुद्रक **औदुंबर अशोक खेलुडे यांच्या व्यंकटेश प्रिंटर्स ॲन्ड पब्लिकेशन** मार्डी ता.उत्तर सोलापूर. जिल्हा सोलापूर महाराष्ट्र येथे छापून मार्डी ता. उत्तर सोलापूर. जिल्हा सोलापूर महाराष्ट्र येथे प्रकाशित केले.

❍ **संपादक- सपना विक्रम खेलबुडे. मोबाईल नं.८४११९५९३९३**

**OWNED, PRINTED AND PUBLISHED BY SAPANA VIKARAM KHELBUDE** A/P MARDI,TAI-NORTH SOLAPUR, DIS- SOLAPUR.413002 [MAH].
**PRINTED BY AUDUMBAR ASHOK KHELBUDE**. A/P- MARDI TAL-NORTH SOLAPUR DIS- SOLAPUR413002 [MAH] .**PRINTED AT VYANKATESH PRINTERS AND PUBLICATION** A/P- MARDI TAL-NORTH SOLAPUR DIS- SOLAPUR413002 [MAH] .
**PUBLISHED AT A/P- MARDI TAL-NORTH SOLAPUR DIS- SOLAPUR413002 MAH** .
❍ **EDITOR- SAPANA VIKARAM KHELBUDE CELL- 8411959393**
❍ **E-Mall : Solapursancharnews7@gmail.com RNI NO. MAHMAR/2021/81364**

# कांदा लिलावातून ३६० कोटींची उलाढाल आवक कमी असूनही दरवाढ थांबली



सोलापूर, दि. १२- राज्यातील तिसऱ्या क्रमांकाची बाजार समिती असलेल्या येथील कृषी उत्पन्न बाजार समितीमध्ये गेल्या दीड महिन्यात कांदा लिलावातून सुमारे ३६० कोटी रुपयांची उलाढाल झाली आहे. सध्या आवक कमी असूनही कांद्याला अपेक्षित दर मिळत नसल्याने शेतकऱ्यांमधून नाराजी व्यक्त केली जात आहे.

महाराष्ट्रात नाशिक जिल्ह्यातील लासलगाव नंतर सोलापूर बाजार समिती कांदा विक्रीसाठी प्रसिध्द आहे. येथील बाजार समितीत लिलाव झालेला कांदा दक्षिण भारताकडे पाठविला जातो. यंदा १ ते ३० नोव्हेंबर या कालावधीत विक्रीसाठी आलेल्या कांद्याला चांगला दर मिळाला. नोव्हेंबरमध्ये कांदा लिलावातून सुमारे २५५ कोटी रुपयांची उलाढाल झाली. १ ते ११ डिसेंबर या कालावधीत १०५ कोटी रुपयांची उलाढाल झाल्याची माहिती बाजार समितीकडून देण्यात आली. बुधवारी ४२६ गाड्यांमधून ४२ हजार ६०० क्विंटल कांद्याची आवक झाली. त्यातील चांगल्या प्रतीच्या कांद्याला प्रतिक्विंटल ६ हजार ३०० रुपयांचा दर मिळाला. सरासरी दर ३ हजार रुपयांपर्यंत होता. या महिन्याच्या पहिल्या आठवड्यात कांदा ७ हजार ६०० रुपये इतक्या उच्चांकी दराने विकला गेला. सध्या कांद्याची आवक कमी झाल्याने दर वाढण्याऐवजी ते स्थिर आहेत. त्यामुळे व्यापाऱ्यांकडून दर पाडला गेला का, अशी शंका शेतकऱ्यांमधून व्यक्त केली जात आहे.

परराज्यातील १०० ते १५० कांदा खरेदीदार सोलापूरला आले असून कांदा लिलावानंतर एकूण रकमेच्या ५० टक्के रक्कम त्याच दिवशी तर उर्वरित रक्कम अकरा ते पंधरा दिवसानंतर शेतकऱ्यांना दिली जात आहे. आडते शेतकऱ्यांना तारखा घालून धनादेश देत आहेत.

**पंधरा अडत्यांवर कारवाई**

कांदा लिलावानंतर शेतकऱ्यांची बिले न दिलेल्या पंधरा अडत्यांवर सोलापूर बाजार समितीकडून कारवाई करण्यात आली होती. त्यापैकी दहा अडत्यांचा परवाना रद्द केला होता. तर पाच अडत्यांच्या दुकानास टाळे लावले होते. बाजार समितीच्या या कारवाईनंतर अडत्यांनी शेतकऱ्यांना बिले दिली. सध्या चार अडत्यांच्या दुकानाचे टाळे काढल्याची माहिती बाजार समितीच्या अधिकाऱ्याने दिली.

**येथून कांद्याची आवक**

सोलापूर, नगर, नाशिक, पुणे, सातारा, धाराशिव, लातूर, विजयपूर, कलबुरगी या जिल्ह्यांमधून कांदा सोलापूर बाजार समितीत विक्रीसाठी येत आहे.

**या राज्यांकडे जातो कांदा**

सोलापुरात लिलाव झालेला कांदा छत्तीसगड, आंध्र प्रदेश, तेलंगणा, कर्नाटक, तमिळनाडू, पश्चिम बंगाल या राज्यांकडे पाठविला जातो.

## रंभवननजीक गटारवरील लोखंडी जाळी चोरीस

### बसस्थानकाजवळ अपघाताची शक्यता

सोलापूर, दि. १२- स्मार्ट सिटी अंतर्गत रंगभवन ते जिल्हा न्यायालयापर्यंत गटार बांधून त्यावर लोखंडी जाळी लावण्यात आली होती. त्यावरील काही जाळी चोरीस गेल्या असून अक्कलकोटकडे जाणाऱ्या एसटी थांबासमोर गटार उघडी असल्यामुळे गटारीत पाय अडकून प्रवाशांचा अपघात होण्याची शक्यता वाढली आहे.

स्मार्ट सिटी अंतर्गत शहरात झालेल्या अनेक प्रकल्पांची वाट लागली आहे. त्यापैकीच रंगभवन ते जिल्हा न्यायालयापर्यंतच्या गटारीचीही दुर्दशा झाली आहे. पावसाचे पाणी वाहून जाण्यासाठी गटार बांधून त्यावर लोखंडी जाळी बसविण्यात आली होती. परंतु त्यावरील अनेक जाळी सध्या चोरीस गेल्याने गटार उघडी पडली आहे. याच मार्गावर अक्कलकोटकडे जाणाऱ्या एसटी गाड्या थांबतात. रंगभवन एसटी थांब्यासमोरच गटार उघडी असल्याने एसटी आल्यानंतर जागा पकडण्यासाठी धावपळ करणाऱ्या प्रवाशांचे पाय गटारीत अडकून येथे अपघात होऊ शकतो. त्यामुळे गटारीवर लोखंडी जाळी बसविण्याची मागणी नागरिकांमधून करण्यात येत आहे.

सध्या महापालिकेकडून शहरातील प्रमुख रस्त्यांवर स्वच्छता अभियान चालू आहे. परंतु रंगभवन ते जिल्हा न्यायालयाकडे जाणाऱ्या रस्त्यावरील तुंबलेल्या गटारीतील अस्वच्छता सर्वांना खटकणारी आहे. स्मार्ट सिटीच्या अधिकाऱ्यांनी याकडे लक्ष देऊन होणारा संभाव्य धोका टाळावा, अशी नागरिकांची अपेक्षा आहे.

## आंतरभारती सोलापूर शाखेचा २५ डिसेंबरला स्नेहमेळावा

सोलापूर, दि. १२- आंतरभारती सोलापूर शाखेच्यावतीने बुधवार, २५ डिसेंबर रोजी सकाळी ९ ते सायंकाळी ५ या वेळेत नागेश करजगी ऑर्चिड स्कूल, जुनी मिल कंपाउंड येथे स्नेहमेळावा आयोजित करण्यात आला आहे.

धर्म, जाती, भाषा, लिंगभेद, आर्थिक विषमता इत्यादींच्या कारणांनी विभागलेल्या मानव जातीला एकत्र आणण्यासाठी, दुभंगलेली मने साधण्यासाठी आंतरभारती या संस्थेची स्थापना करण्यात आली आहे. स्वातंत्र्यपूर्व काळापासून संपूर्ण देशात आंतरभारतीचे काम चालू आहे. सोलापुरातही आंतरभारतीचे कार्य सुरू ठेवण्यासाठी स्नेहमेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे. महाराष्ट्रातून विविध जिल्ह्यांतील आंतरभारतीचे सदस्य या मेळाव्यात सहभागी होणार आहेत. या मेळाव्यात सहभागी होऊन राष्ट्रीय एकात्मतेच्या कार्यात भाग घ्यावा, असे आवाहन स्वागताध्यक्ष कुमार करजगी, प्राचार्य सुभाष शास्त्री यांनी केले आहे.

## जांबमुनी रथोत्सव अध्यक्षपदी साळवे

सोलापूर, दि. १२- जांबमुनी मोची समाज मध्यवर्ती रथोत्सव समितीच्या अध्यक्षपदी शानराव मार्तंड साळवे यांची निवड करण्यात आली.

जांबमुनी मोची समाज सांस्कृतिक भवन येथे मोची समाजाचे जिल्हाध्यक्ष देवेंद्र भंडारे यांच्या अध्यक्षतेखाली पार पडलेल्या बैठकीत ही निवड करण्यात आली.

यावेळी माजी महापौर संजय हेमगड्डी, समाजाचे माजी अध्यक्ष प्रा. नरसिंह आसादे, बसवराज म्हेत्रे, युवक अध्यक्ष रतिकांत कमलापुरे, बाबूराव संगेपांग, हणमंतू सायबोळू, अंबादास करगुळे, माजी नगरसेवक अंबादास दोडमणी, सिद्राम अट्टेलूर, उपाध्यक्ष दिनेश म्हेत्रे, नागनाथ कासलोलकर, राजू निलगंटी उपस्थित होते.

जनरल सेक्रेटरी सिद्राम कामाटी यांनी प्रास्ताविक करून आभार मानले.

## वसंतराव नाईक विकास महामंडळाच्या योजनांचा लाभ घेण्याचे आवाहन

सोलापूर, दि. १२- वसंतराव नाईक विमुक्त जाती व भटक्या जमाती विकास महामंडळामार्फत विमुक्त जाती, भटक्या जमाती व विशेष मागास प्रवर्गातील नागरिकांसाठी राबविण्यात येत असलेल्या विविध योजनांचा लाभ घेण्याचे आवाहन जिल्हा व्यवस्थापक किरण गिऱ्हे यांनी केले आहे.

वसंतराव नाईक विमुक्त जाती व भटक्या जमाती विकास महामंडळांतर्गत वडार समाजाच्या सर्वांगीण विकास व आर्थिक उन्नतीसाठी पैलवान कै. मारुती चव्हाण- वडार आर्थिक विकास महामंडळ व रामोशी समाजाच्या आर्थिक उन्नतीसाठी राजे उमाजी नाईक आर्थिक विकास महामंडळ तसेच वसंतराव नाईक विमुक्त जाती व भटक्या जमाती विकास महामंडळामार्फत १ लाख रुपये थेट कर्ज योजना राबविण्यात येत आहे. २०२४-२५ या आर्थिक वर्षाचे उद्दिष्ट प्राप्त झाले असून १ लाख थेट कर्ज योजनेमध्ये संपूर्ण कर्ज महामंडळाकडून दिले जाणार आहे. लाभार्थ्यांने २०८५ चे नियमित ४८ समान मासिक हप्त्यांमध्ये परतफेड करणाऱ्या लाभार्थ्यांना व्याज अदा करावे लागणार नाही; परंतु थकीत हप्त्यांवर द.सा.द.शे. ४ टक्के व्याजदर आकारण्यात येणार आहे.

अधिक माहितीसाठी वसंतराव नाईक विमुक्त जाती व भटक्या जमाती विकास महामंडळ (मर्या.), डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन, दुसरा मजला सात रस्ता सोलापूर (दुरध्वनी क्रमांक ०२१७-२९९२०८०) येथे संपर्क करावा, जिल्ह्यातील विमुक्त जाती व भटक्या जमाती व विशष मागास प्रवर्गातील लोकांनी या योजनेचा लाभ घ्यावा, असे आवाहनही जिल्हा व्यवस्थापक किरण गिर्हे यांनी केले आहे.

## संविधानाच्या प्रतिकृतीची विटंबना; देशद्रोहाचा गुन्हा दाखल करा

बार्शी, दि. १२- परभणी जिल्ह्यामध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यासमोरील संविधानाच्या प्रतिकृतीची विटंबना करणाऱ्या व्यक्तीवर देशद्रोहाचा गुन्हा दाखल करा, अशी मागणी वंचित बहुजन आघाडीचे जिल्हा उपाध्यक्ष ॲड. विवेक गाजशिव यांनी केली.

संबंधितांवर कठोर कारवाई करून या घटनेमागे असलेल्या खऱ्या मास्टरमाईंडचा शोध घेण्याची मागणीही करण्यात आली. मागण्यांचे निवेदन तहसीलदार एफ.आर. शेख यांना देण्यात आले.

तहसीलदार शेख यांना दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, यातील खऱ्या सूत्रधाराचा शोध घ्यावा. महाराष्ट्रातील सर्व डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या पुतळे असणाऱ्या ठिकाणी सुरक्षा वाढवा, असे प्रकार आम्ही यापुढे खपवून घेणार नाहीत, असा इशारादेखील यावेळी दिला.

यावेळी वंचित बहुजन आघाडीचे जिल्हा उपाध्यक्ष ॲड. विवेक गजशिव, रोहित बोकेफोडे, तालुका उपाध्यक्ष भैरवनाथ शिंदे, स्वप्निल लंकेश्वर, तालुका महासचिव शशिकांत पाचकुडवे, सूरज भालशंकर, ॲड. स्वप्निल खंडागळे, ॲड. जगदीश दगडे, ॲड. कपिल भोसले, ॲड. शुभांगी गायकवाड, वामन आहिरे, मोहसीन तांबोळी, निलेश मस्के, अरबाज शेख, इब्राहिम शेख, निलेश शिंदे, गणेश वाघमारे, आनंद ननवरे, लक्ष्मण पालके, अश्वकुमार अहिरे आदी उपस्थित होते.

## राष्ट्रवादी कामगार सेलतर्फे गरीब कामगारांना अन्नधान्य

सोलापूर, दि. १२- राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे राष्ट्रीय नेते, माजी केंद्रीय कृषिमंत्री शरद पवार यांच्या वाढदिवसानिमित्त राष्ट्रवादी कामगार सेलच्यावतीने बुधवारी सेलचे अध्यक्ष डॉ. गोवर्धन सुंचू यांच्या अशोक चौकातील संपर्क कार्यालयात गरीब व गरजू कामगारांना प्रत्येकी पाच किलोप्रमाणे ४५ जणांना अन्नधान्य वाटप करण्यात आले.

नाट्यकलावंत बालाजी श्रीचिप्पा यांच्या हस्ते अन्नधान्य वाटप करण्यात आले. यावेळी डॉ. गोवर्धन सुंचू यांची उपस्थिती होती. अन्नधान्य वाटपासाठी बालाजी बुधारम, सतीश दासरी, सोमनाथ कनकी, सतीश गोरंटला, तिमप्पा मादगुंडी, दामोदर येलदी, नरेश संगा आदींनी परिश्रम घेतले.

## 'मविआ'चे खासदार फुटणार असल्याची चर्चा

मुंबई- महाराष्ट्र विधानसभेच्या निवडणुकीत महायुतीला बहुमत मिळालं, तर महाविकास आघाडीला पराभवाचा धक्का बसला. महायुतीला मिळालेल्या यशानंतर राज्यात महायुतीचं सरकार स्थापन झालं. ५ डिसेंबर रोजी देवेंद्र फडणवीस यांनी मुख्यमंत्री पदाची शपथ घेतली, तर एकनाथ शिंदे आणि अजित पवार यांनी उपमुख्यमंत्री पदाची शपथ घेतली. आता सरकार स्थापन होऊन काही दिवस झाले आहेत. मात्र, अद्यापही मंत्रिमंडळाचा विस्तार झालेला नाही. यातच महायुतीमध्ये गृहखात्यावरून रस्सीखेच सुरु असल्याची चर्चा आहे.

## सिध्देश्वर बाल मंदिरचे स्नेहसंमेलन उत्साहात

### पारितोषिक वितरण सोहळाही संपन्न

सोलापूर, दि. १२- भवानी पेठ येथील श्री सिध्देश्वर बाल मंदिर प्राथमिक शाळेचे वार्षिक स्नेहसंमेलन व पारितोषिक वितरण समारंभ हुतात्मा स्मृती मंदिर येथे पार पडला.

या कार्यक्रमास प्रमुख पाहुणे शाळेचे माजी विद्यार्थी डॉ. विकास लोणीकर उपस्थित होते. अध्यक्षस्थानी सिध्देश्वर देवस्थान शिक्षण समितीचे सदस्य गुरुराज माळगे, देवस्थानचे विश्वस्त ॲड. आर. एस. पाटील, काशीनाथ ढोले, सिध्देश्वर कॉलेज ऑफ फिजीओथेरपीचे प्राचार्य डॉ. टी. सुरेशकुमार, पालक-शिक्षक संघाचे उपाध्यक्ष भीमाशंकर कोनाळी, शाळेच्या माजी मुख्याध्यापिका शांता मरगूर, वैशाली कटाप, माजी शिक्षिका गणेचारी, सलगरे आदींची प्रमुख उपस्थिती होती. प्रारंभी ग्रामदैवत सिध्दरामेश्वर व कर्मयोगी अप्पासाहेब काडादी यांच्या प्रतिमापूजनाने झाली. प्रास्ताविक मुख्याध्यापिका गीता चिकमनी यांनी केले. स्वागतगीत अनुजा देशपांडे यांनी सादर केले व त्यांना तबल्याची साथ चिन्मय बिराजदार व पखवाज साथ श्रेयस शिंदे यांनी दिला. पाहुण्यांचा परिचय अर्चना मरगूर यांनी करून दिला. बक्षीस वितरण यादी वाचन ज्योती लंगोटे यांनी केला. शिल्पा भैरप्पा यांनी पीपीटीच्या माध्यमातून शाळेचा वार्षिक अहवाल सादर केला.

दरम्यान, यावेळी शाळेच्या विविध परीक्षांमध्ये घवघवीत यश मिळवलेल्या गुणवंत विद्यार्थ्यांना प्रमुख पाहुण्यांच्या व मान्यवरांच्या हस्ते पारितोषिक देण्यात आली. यावेळी शाळेच्या बालचमूंनी हिंदी व मराठी रिमिक्स गाणी, लावणी वाघ्या मुरळी, संस्कृती आईगीरी नंदिनी, इन्स्टा रिल्स, रेट्रो टू मेट्रो, देशभक्तीपर गीत अशा बहारदार नृत्यांचे सादरीकरण करून कलाविष्कार सादर केला.

कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे डॉ. लोणीकर यांनी आपल्या यशाचे श्रेय शाळेला व गुरुजनांना देऊन स्पर्धेच्या युगात पालकांनी विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव द्यावा, असे आवाहन केले. माळगे यांनीही शाळेने राबवलेल्या उपक्रमांचे कौतुक केले. माजी विद्यार्थी डॉ. लोणीकर यांचा शाळेतर्फे सन्मान करण्यात आला. या कार्यक्रमास सांस्कृतिक प्रमुख श्वेता शिंदे यांच्यासह शिक्षक, पालक व विद्यार्थी उपस्थित होते. सूत्रसंचालन शशिकला नंदगावकर यांनी केले तर आभार गीता मगाई यांनी मानले.

# ज्वारीच्या कोठारात यंदा ज्वारीचा पेरा निम्म्यावर, लांबलेल्या पावसाचा परिणाम

सोलापूर : शतकानुशतके 'ज्वारीचे कोठार' म्हणून ओळख असलेल्या मंगळवेढ्यासह संपूर्ण सोलापूर जिल्ह्यात यंदा लांबलेल्या पावसामुळे केवळ ७३ टक्के एवढाच ज्वारीचा पेरा झाला आहे. मंगळवेढ्यात तर जेमतेम ५५ टक्के, तीसुद्धा उशिराने पेरणी झाली आहे. त्यामुळे यंदा ज्वारीच्या उत्पादनासह खमंग, चवदार आणि लुसलुशीत हुरडा खूपच कमी प्रमाणात मिळणार आहे.

मंगळवेढ्याच्या मालदांडी ज्वारीची खमंग, खरपूस अशी भाकरी घास मोडल्याबरोबर तोंडात विरघळते. देशभर मागणी असलेल्या या ज्वारीला यापूर्वीच जीआय मानांकन मिळाले आहे. मुबलक प्रमाणात उत्पादन होणारी येथील ज्वारी केवळ भाकरी आणि हुरड्यापुरती नाही, तर त्यापासून अन्य उपपदार्थांसाठी नावारूपाला आली आहे.

मंगळवेढ्याच्या पूर्व भागात सुमारे १४५ चौरस किलोमीटर जमिनीचा पट्टा सपाट, कसदार, पूर्णतः खोलवर काळ्याभोर मातीचा आहे. थोड्याशा पावसाने येथे ज्वारीचे उत्पादन घेतले जाते. रब्बी हंगामात येथील ज्वारीचे सरासरी पेरणी क्षेत्र ३५ हजार ४५७ हेक्टर आहे. परंतु यंदा भरलेल्या पावसाळ्यात मोठ्या प्रमाणात पाऊस लांबला. त्यामुळे उशिरापर्यंत शेतात वापसा तयार न झाल्यामुळे ज्वारीची पेरणी अनेक दिवस खोळंबून राहिली. ऑक्टोबरपर्यंत केवळ ३० टक्क्यांपर्यंत पेरणी झाली. त्यानंतर उशिराने का होईना शेतकऱ्यांनी ज्वारीची लावली. तरीही आतापर्यंत जेमतेम ५५ टक्के म्हणजे १९ हजार ५७३ हेक्टर क्षेत्रांतच पेरणी होऊ शकली.

खरीप हंगाम संपताच साधारणतः ऑगस्टपासून रब्बी ज्वारीची पेरणी सुरू होते. १५ सप्टेंबर ते १५ ऑक्टोबरपर्यंत पेरणी संपते आणि डिसेंबर-जानेवारीमध्ये शेतात कोवळ्या ज्वारीचा हिरवा, सोनेरी हुरडा तयार होतो. हुरड्याचा हंगाम संपताच परिपक्व झालेल्या ज्वारीची काढणी होते.

तथापि, यंदा लांबलेल्या पावसाबरोबरच वाढलेली शेतमजुरी, वाढलेला लागवड खर्च यामुळे ज्वारीचा पेरा निम्म्यावरच होऊ शकला. परिणामी, यंदा ज्वारीची भाकरी आणि हुरडा निम्म्यावरच मिळणार आहे.

सोलापूर जिल्ह्यात खरीप हंगामात ज्वारीचे सरासरी क्षेत्र तीन लाख १८ हजार ५७ हेक्टर एवढे असून, त्यांपैकी दोन लाख ३३ हजार ३५६ हेक्टर क्षेत्रात (७३.५३ टक्के) ज्वारीचा पेरा तसा उशिरानेच झाला आहे. मंगळवेढ्याबरोबर बार्शी, माढा, करमाळा, अक्कलकोट, सांगोला, दक्षिण सोलापूर आदी भागात ज्वारी होते. परंतु बार्शी (११९ टक्के) व अक्कलकोट (९७.८९ टक्के) यांचा अपवादवगळता इतर भागांत पेरा कमी झाला आहे. करमाळ्यात ज्वारीचे सरासरी पेरणी क्षेत्र ५४ हजार ६३६ हेक्टर असताना प्रत्यक्षात २६ हजार २०५ हेक्टर क्षेत्रावरच (४७.९६ टक्के) पेरा झाला आहे. सांगोल्यात सरासरी ३५ हजार ४५७ हेक्टर क्षेत्रापैकी २१ हजार ४८५ हेक्टर (५७.३३ टक्के) क्षेत्रात ज्वारीचे उत्पादन घेतले जात आहे. गतवर्षीच्या रब्बी हंगामात मंगळवेढ्यात ८०.१९ टक्के ज्वारीच्या पेरण्या झाल्या होत्या. बार्शीत १४९ टक्के, करमाळ्यात ६४.४८ टक्के, सांगोल्यात ६६.४२ टक्के, माढ्यात ८६ टक्के, दक्षिण सोलापुरात ८१.५२ टक्के, अक्कलकोटमध्ये ७३.१७ टक्के ज्वारीची लागवड झाली होती.

# 'ऑपरेशन लोटस'वरून आरोप-प्रत्यारोप

## चंद्रशेखर बावनकुळेंच्या दाव्याचे नाना पटोलेंकडून खंडन

मुंबई : विधानसभा निवडणुकीतील घवघवीत यशानंतर भाजपने स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीसाठी मोर्चेबांधणीला सुरुवात केली आहे. तर महाविकास आघाडी अद्यापही पराभवाबद्दल खल सुरू आहे. दरम्यान, 'मविआ'तील काही खासदार-आमदार भाजपच्या संपर्कात असल्याचा दावा प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी केल्याने राज्यात पुन्हा 'ऑपरेशन लोटस'ची चर्चा सुरू झाली आहे. परंतु हा दावा खोडून काढताना, भ्रष्ट मार्गाने मिळवलेल्या पैशांच्या जोरावर लोकशाही विकत घेण्याचा प्रयत्न म्हणजे 'ऑपरेशन लोटस' असल्याची टीका काँग्रेस प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनी भाजपवर केली आहे.

लोकसभा निवडणुकीत भाजपला राज्यामध्ये मोठा फटका बसला. भाजपला केंद्रात सरकार स्थापनेसाठी घटकपक्षांचे सहकार्य घ्यावे लागले आहे. भाजपचे संख्याबळ वाढविण्यासाठी आता प्रयत्न करण्यात येणार आहेत. भाजपला केंद्रात संख्याबळ वाढविण्याची गरज असून राज्यात प्रचंड बहुमत असल्याने आमदारांची तेवढी निकड नाही. परंतु पक्षाकडून पाठबळ मिळत नाही आणि पक्ष प्रमुखांकडून दुर्लक्ष करण्यात येत आहे. मतदारसंघातील जनतेचे काही प्रश्न सोडविण्याच्या दृष्टीनेही सध्या फारसे प्रयत्न होत नाहीत, अशी 'मविआ'तील काही खासदारांची तक्रार असल्याचे बावनकुळे यांनी नमूद केले. त्यामुळे सत्ताधारी महायुतीमध्ये गेल्यास मतदारसंघातील कामे व प्रकल्पही मार्गी लावता येतील, असा या खासदारांचा विचार आहे.

महाविकास आघाडीचे पाच-सहा खासदार भाजपच्या संपर्कात असून त्यांना केंद्रात मंत्रीपदे किंवा अन्य जबाबदाऱ्या देण्याचे आश्वासन मिळाल्यास ते राजीनामा देऊन पुन्हा निवडणूक लढविण्यास तयार असल्याचे सूत्रांनी सांगितले. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या संकल्पनेला साथ देण्यासाठी आणि मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली काम करण्यासाठी ज्यांना पक्षात यायचे आहे, त्यांचे स्वागत केले जाईल, असे बावनकुळे यांनी नमूद केले.

शिवसेना (ठाकरे) नेते खासदार संजय राऊत यांनी भाजप कोणतेही 'ऑपरेशन लोटस' राबवू शकते. त्यांच्याकडे अमाप पैसा व यंत्रणा आहे. यापूर्वीही त्यांनी अशा प्रकारे माणसे फोडली. एकनाथ शिंदे किंवा अजित पवार यांच्यासारखी माणसे का पळून गेली, हे दोघेही भीतीपोटीचे गेले. हे 'ऑपरेशन लोटस' नव्हते तर 'ऑपरेशन डर' होते. ते घाबरून तिकडे गेले, अशी टीका केली.

लोकशाही विकत घेण्याचा प्रयत्न : पटोले

महाविकास आघाडीचे खासदार, आमदार भाजपच्या संपर्कात असल्याचा प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांचा दावा काँग्रेस प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनी खोडून काढला आहे. या कथित चर्चेत कोणताही अर्थ नाही. महायुतीचे पहिले अधिवेशन नागपुरात होत आहे. राज्यातील जनता अनेक समस्यांचा सामना करत आहे. शेतकऱ्यांना सरसकट तीन लाख रुपयांची कर्जे दिली पाहिजे, नोकरभरती कशी करणार, अशा विविध मुद्द्यांवर साधकबाधक चर्चा नागपूरच्या अधिवेशनात होणे अपेक्षित आहे. यासाठी नागपूर अधिवेशन कमीत कमी एक महिन्याचे असावे अशी मागणी केली होती पण भाजपा युती सरकारने केवळ पाच दिवसांचे अधिवेशन सरकार चर्चेपासून पळ काढत असल्याची टीका त्यांनी केली.

# नाशिकरोड परिसरात नायलॉन मांजा विक्रेता ताब्यात

नाशिक : बंदी असलेल्या नायलॉन मांजाची विक्री करणाऱ्या संशयितावर नाशिकरोड पोलीस ठाण्याच्या गुन्हे शोध पथकाने कारवाई केली असून ६१,९०० रुपयांचा मांजा जप्त करण्यात आला.

नाशिकरोड पोलीस ठाण्याच्या गुन्हे शाखेतील अंमलदार समाधान वाजे, अजय देशमुख यांना एक जण सिन्नर फाट्यावरील मार्केट यार्डात नायलॉन मांजा विक्री करण्यासाठी येणार असल्याची माहिती मिळाली. त्यांनी वरिष्ठ निरीक्षक अशोक गिरी यांना माहिती दिल्यानंतर तपासी पथकाने सापळा रचला.

सिन्नरफाटा- एकलहरा रोड येथील मार्केट यार्डच्या बाजूला एक जण संशयास्पदरित्या फिरत असल्याचे दिसले. त्याची तपासणी केली असता वेगवेगळ्या रंगाचा नायलॉन मांजा आढळून आला. संशयिताने त्याचे नाव देवेंद्र शिरसाठ असे सांगितले. देवेंद्र याला ताब्यात घेण्यात आले असून ६१,९०० रुपयांचा मांजा जप्त करण्यात आला.

# जिल्ह्यात शंभर दिवसांसाठी क्षयरोग जागृती मोहीम

नाशिक : जिल्हा क्षयरोग विभागाच्या वतीने राष्ट्रीय क्षयरोग दुरीकरण कार्यक्रमांतर्गत जिल्ह्यात १०० दिवसांसाठी क्षयरोग जनजागृती मोहीम राबवण्यात येत आहे. या मोहिमेच्या माध्यमातून आतापर्यंत चार हजार ४११ नागरिकांशी संपर्क साधण्यात आला. फिरत्या वाहनाच्या माध्यमातून संबंधितांची तपासणी करुन औषधोपचार करण्यात येत आहेत

जिल्हाधिकारी जलज शर्मा यांच्या हस्ते या मोहिमेचा सुरुवात झाली. या मोहिमेसाठी देशभरातून निवडलेल्या ३४७ जिल्ह्यात नाशिकचा समावेश आहे. क्षयरोग लवकरात लवकर ओळखून त्यावर उपचार होणे गरजेचे आहे. यासाठी समाजातील सर्व घटकांनी प्रयत्न करण्याची आवश्यकता असून केंद्र सरकारच्या वतीने १०० दिवसांचा हा नाविन्यपूर्ण उपक्रम राबवला जात आहे. याअंतर्गत जिल्ह्यातील दाट वस्ती असलेल्या भागांमध्ये जाऊन विशेष शोध मोहीम राबवण्यात येत आहे. रुग्ण किंवा संशयित रुग्णांचे समुपदेश करण्यात येत आहे.

आरोग्य विभागातील आशा, आरोग्यसेवक, समाजातील अनेक संस्था यांनी सहभाग घेतला आहे. या मोहिमेच्या माध्यमातून क्षयरुग्ण शोधत त्यांना उपचार सुरू करणे, नवीन क्षयरुग्णांचे प्रमाण कमी करणे, क्षयरुग्णांविषयी भेदभाव कमी करणे, तसेच या शंभर दिवसांमध्ये अती जोखमीचे म्हणून ६० वर्षांवरील व्यक्ती, मधुमेह असणाऱ्या व्यक्ती, धुम्रपान करणाऱ्या व्यक्ती, यापूर्वी क्षयरोगाचा उपचार घेतलेल्या व्यक्ती, क्षयरुग्णांच्या संपर्कातील घरातल्या व्यक्ती, एचयव्हीबाधित व्यक्ती यांच्यावर लक्ष केंद्रीत करण्यात येत आहे.

जिल्ह्यात आदिवासीबहुल, वीभट्टी, कारखाना परिसर आदी ठिकाणी ही विशेष मोहीम राबवली जात आहे. यासाठी फिरत्या वाहनांच्या माध्यमातून क्षयरोगसदृश्य अथवा काही लक्षणे असणाऱ्या रुग्णांची तपासणी करण्यासाठी आवश्यक डिजिटल उपकरणे आहेत. यामुळे रोगाचे निदान करणे सहज शक्य होत आहे. आतापर्यंत चार हजार १११ नागरिकांपर्यंत पोहचण्यात आरोग्य विभागाला यश आले आहे. या अंतर्गत जिल्ह्यातील संमती दिलेल्या क्षयरुग्णांना पंतप्रधान क्षयमुक्त भारत अभियान अंतर्गत निक्षयमित्र यांच्याकडून पोषण आहार संचाचे वाटप करण्यात येत आहे.

# सातारा जिल्हा सत्र न्यायाधीश लाचप्रकरणी चौकशीसाठी ताब्यात

सातारा : 'लाच मिळविण्याचा प्रयत्न केल्याप्रकरणी सातारा जिल्हा सत्र न्यायाधीशांना लाचलुचपत विभागाने चौकशीसाठी ताब्यात घेतले आहे,' अशी माहिती लाचलुचपत विभागाच्या अपर पोलीस अधीक्षक डॉ. शीतल जानवे खराडे यांनी दिली.

पुणे येथील एका तरुणीने दिलेल्या तक्रारीवरून आनंद मोहन खरात, किशोर संभाजी खरात, जिल्हा न्यायाधीश धनंजय निकम आणि एका अनोळखी व्यक्तीच्या विरोधात सातारा शहर पोलीस ठाण्यात गुन्ह्याची नोंद झाली आहे. तक्रारदार तरुणीचे वडील एका गुन्ह्यात सातारा जिल्हा कारागृहात आहेत. त्यांच्या जामिनावर जिल्हा सत्र न्यायालयात धनंजय निकम यांच्यासमोर सुनावणी सुरू आहे. 'संशयित आनंद व किशोर खरात यांनी जिल्हा सत्र न्यायाधीशांशी संगनमत करून एका अनोळखी व्यक्तीच्या माध्यमातून जामीन अर्जासाठी मदत करण्याच्या बदल्यात पाच लाख रुपयांची मागणी केली. हा प्रकार ३, ९ आणि १० डिसेंबर रोजी घडला,' असे तरुणीने दिलेल्या तक्रारीत म्हटले आहे. पोलीस निरीक्षक राजेंद्र मस्के तपास करीत आहेत. 'याबाबत योग्य ती चौकशी करून माध्यमांना सर्व माहिती दिली जाईल,' असे डॉ. शीतल जानवे खराडे यांनी सांगितले.

# पहिला मंत्रीमंडळ विस्तार कधी होणार?

नवी दिल्ली- महाराष्ट्राच्या राजकारणात गेल्या काही दिवसांपासून देवेंद्र फडणवीस सरकारच्या पहिल्या मंत्रीमंडळ विस्ताराची जोरदार चर्चा पाहायला मिळत आहे. यासंदर्भात राजधानी दिल्ली आणि मुंबई अशा दोन्ही ठिकाणी अनेक बैठका झाल्याचं दिसून आलं. काही बैठका तिन्ही पक्षांच्या नेतृत्वामध्ये झाल्या तर काही पक्षांतर्गत बैठकाही झाल्याचं पाहायला मिळालं. मंत्रीमंडळ विस्तार कधी आणि कसा होणार? याबाबत फक्त दावे होत असले, तरी नेमका हा विस्तार कधी होणार याची निश्चित माहिती समोर येत नव्हती. आता मात्र खुद्द उपमुख्यमंत्री अजित पवारांनी त्याबाबत मोठं विधान केलं आहे.

शरद पवार यांच्या वाढदिवसानिमित्त आज अजित पवार यांनी सहकुटुंब त्यांची दिल्ली येथील निवासस्थानी भेट घेऊन शुभेच्छा दिल्या. यावेळी जवळपास अर्धा तास अजित पवार, त्यांच्या पत्नी व खासदार सुनेत्रा पवार, मुलगा पार्थ पवार, खासदार प्रफुल्ल पटेल आदी नेतेमंडळीही शरद पवारांच्या निवासस्थानी उपस्थित होती. त्यामुळे या बैठकीत नेमकं काय घडलं? याबाबत राजकीय तर्क-वितर्कांना उधाण आलेलं असतानाच भेट झाल्यानंतर बाहेर आल्यावर अजित पवारांनी माध्यमांशी बोलताना इतर मंत्र्यांच्या शपथविधीबाबत मोठं विधान केलं आहे.

शरद पवारांची भेट घेऊन बाहेर आलेल्या अजित पवारांना माध्यमांनी राज्य मंत्रिमंडळातील इतर मंत्र्यांचा शपथविधी कधी होणार? याबाबत विचारणा केली. त्यावेळी अजित पवारांनी दोन दिवसांनी शपथविधी होणार असल्याचा उल्लेख केला. राज्यात सध्या मुख्यमंत्री व आम्ही दोन उपमुख्यमंत्री यांचाच शपथविधी झाला आहे. त्यामुळे सगळ्यांनाच इतर मंत्र्यांचा शपथविधी कधी होणार? याबाबतची उत्सुकता आहे. बहुतेक १४ तारखेला हा शपथविधी होईल, असं अजित पवार म्हणाले.

दरम्यान, येत्या १४ तारखेला नेमके कुणाचे किती मंत्री शपथ घेणार? याविषयी अनेक अंदाज वर्तवले जात आहेत. त्यानुसार भारतीय जनता पक्षाचे २०, एकनाथ शिंदेंचे १३ तर अजित पवारांचे १० आमदार मंत्रीपदाची शपथ घेणार असल्याची जोरदार चर्चा राजकीय वर्तुळात रंगत आहे. या पार्श्वभूमीवर अजित पवारांचा दिल्ली दौरा चर्चेत आला आहे. यावेळी अमित शाह यांना आपण भेटायला जाणार असल्याचा उल्लेख अजित पवारांनी केला. त्यामुळे राजकीय तर्क-वितर्कांना चांगलंच उधाण आलं आहे.

दरम्यान, अजित पवारांनी आज थेट शरद पवारांची भेट घेतल्यामुळे अनेक तर्क-वितर्क सुरू झाले आहेत. त्यासंदर्भात माध्यम प्रतिनिधींनी विचारणा केली असता अजित पवारांनी त्यांच्या वाढदिवसाचं कारण सांगितलं. आज त्यांचा वाढदिवस आहे. सगळे शरद पवारांची भेट घेऊन शुभेच्छा देत असतात. त्याच हेतूने आम्ही सगळे आलो आहोत, असं ते म्हणाले.

# माणदेशी फाउंडेशनच्या स्टेडियमचे सचिन तेंडुलकर यांच्या हस्ते उद्घाटन


सातारा : ग्रामीण भागातील नवोदित खेळाडूंच्या सुविधेसाठी माणदेशी फाउंडेशनने बांधलेले स्टेडियम निश्चितच तरुणांसाठी क्रीडा केंद्र बनेल, असा विश्वास मास्टर ब्लास्टर सचिन तेंडुलकर याने व्यक्त केला. येथील माणदेशी फाउंडेशनने मेगा सिटी येथे बांधकाम केलेल्या महाराष्ट्रातील ग्रामीण इनडोअर स्पोर्ट्स् बास्केटबॉल व बॅडमिंटन सेंटरचे उद्घाटन सचिन तेंडुलकर याच्या हस्ते करण्यात आले.

# नामसाधर्म्याचा फायदा घेऊन बनावट कुलमुखत्यारपत्राद्वारे फसवणूक

सोलापूर : नामसाधर्म्याचा गैरफायदा घेऊन मोठ्या भावाची बनावट सही करून मिळकतीचे कुलमुखत्यारपत्र दुसऱ्याला देऊन फसवणूक केल्याप्रकरणी एका गृहनिर्माण संस्थेच्या मुख्य प्रवर्तकासह दोघांजणांविरुद्ध सदर बाजार पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाला आहे. यासंदर्भात रफिक गफूर शेख (वय ५८, रा. देशमुख प्लॉट, बार्शी) यांनी दिलेल्या फिर्यादीनुसार हा फसवणुकीचा प्रकार ३० जून १९९७ ते ३ मे २०२३ या कालावधीत सोलापुरात दुय्यम निबंधक कार्यालयात घडला. याप्रकरणी नरसय्या रामदास इप्पाकायल आणि नरसिमलू यल्लप्पा कोंडा अशी गुन्हा दाखल झालेल्या दोघांची नावे आहेत.

प्रियदर्शनी गृहनिर्माण सहकारी संस्थेचे मुख्य प्रवर्तक असलेल्या नरसय्या इप्पाकायल व त्यांचे थोरले बंधू नरसय्या रामदास इप्पाकायल यांच्यात नामसाधर्म्य आहे. त्याचा गैरफायदा घेऊन धाकट्या नरसय्या इप्पाकायल याने थोरल्या नरसय्या इप्पाकायल यांची बनावट सही करून नरसिमलू कोंडा यांना कुलमुखत्यारपत्र लिहून दिले.

## शमीसाठी संघाचे दरवाजे खुले : रोहित शर्मा





ब्रिस्बेन, दि. १२- सध्या ऑस्ट्रेलियामध्ये बॉर्डर-गावसकर ट्रॉफी सुरु आहे. या कसोटी मालिकेतील दोन सामने झाले आहेत. अशातच भारताचा वेगवान गोलंदाज मोहम्मद शमी या मालिकेतील शेवटच्या दोन कसोटी सामन्यात खेळणार का, या प्रश्नाचे उत्तर अनुत्तरित आहे. त्याला लवकरच ऑस्ट्रेलियाला पाठवले जाणार असल्याचे वृत्त समोर आले होते. मात्र, आता शमीच्या ऑस्ट्रेलिया दौऱ्यात नवा ट्विस्ट आला आहे.

मोहम्मद शमीच्या फिटनेसच्या चिंतेमुळे भारतीय क्रिकेट नियामक मंडळ (बीसीसीआय) त्याला ऑस्ट्रेलियाला पाठविण्याची घाई करणार नाही. शमी ऑस्ट्रेलियात खेळणार का, या प्रश्नाचे उत्तर देताना कर्णधार रोहित शर्माने स्पष्ट केले आहे की, मोहम्मद शमीसाठी संघाचे दरवाजे खुले आहेत; परंतु कोणतीही घाई नाही. सय्यद मुश्ताक अली ट्रॉफीमध्ये खेळताना त्याच्या गुडघ्याला पुन्हा सूज आली आहे. आम्ही त्याच्यावर लक्ष ठेवून आहोत आणि आम्ही त्याच्यावर परतण्यासाठी कोणताही दबाव आणू इच्छित नाही, असे स्पष्ट करत रोहितने शमीच्या संघातील पुनरागमानस वेळ लागणार असल्याचे अप्रत्यक्षपणे स्पष्ट केले आहे.

## विराट-अनुष्काच्या 'अकाय'ने मिळवले 'गुगल सर्च' यादीत स्थान!



नवी दिल्ली, दि. १२- भारताचा स्टार फलंदाज विराट कोहली आणि अनुष्का शर्मा यांचा मुलगा अकाय याने गुगलच्या सर्च २०२४ च्या यादीत स्थान मिळवले आहे. गुगल रिपोर्टनुसार, अकाय नावाचा अर्थ या वर्षी सर्वाधिक सर्च करण्यात आलेल्या शब्दांमध्ये आहे.

फेब्रुवारी २०२४ मध्ये अनुष्का आणि विराटला मुलगा झाला. त्यांनी मुलाचे नाव अकाय ठेवल्याचे जाहीर केले. यानंतर हे नाव इतके लोकप्रिय झाले की लोकांनी गुगलवर जाऊन त्याच्या नावाचा अर्थ शोधला. अकाय या शब्दाने गुगलच्या अर्थ प्रश्नांच्या यादीमध्ये स्थान मिळवले. अनेकांनी त्याच्या नावाचा अर्थ सर्च इंजिनवर शोधला. अनुष्का आणि विराटचे दुसरे अपत्य अकाय यांचा जन्म १५ फेब्रुवारी २०२४ रोजी झाला. गुगल सर्च इंजिनच्या मते अकायचे दोन अर्थ आहेत. हिंदी शब्दकोश व संस्कृत भाषेनुसार 'अकाय' नावाचा अर्थ 'निराकार' असा होतो. ज्याला कोणतेही स्वरुप, देह व आकार नाही असा निराकार. तर तुर्कीमध्ये या नावाचा अर्थ चमकणारा चंद्र असा आहे.

## भारताने माघार घेतल्यास ५,७२० कोटी रुपयांचे नुकसान

कराची, दि. १२- चॅम्पियन्स ट्रॉफीच्या आयोजनावरून सुरू असलेला तिढा कायम राहिल्यास फेब्रुवारी-मार्च २०२५ ला आयोजित या स्पर्धेतून यजमान पाकिस्तानने माघार घेतल्यास आयसीसीचे केवळ ६३५ कोटींचे नुकसान होईल, शिवाय पाकला शिक्षेस सामोरे जावे लागेल. यामुळे पाकिस्तान क्रिकेटला आंतरराष्ट्रीय स्तरावर वेगळे पाडले जाण्याचा धोका असेल. त्याचवेळी, भारताने या स्पर्धेतून माघार घेतल्यास आयसीसीला तब्बल ५,७२० कोटी रुपयांचे नुकसान सहन करावे लागेल. आयसीसीच्या ५० षटकांच्या या स्पर्धा आयोजनाशी जुळलेल्या एका अधिकाऱ्याने सांगितले की, 'आयसीसी आणि बीसीसीआयने हायब्रिड मॉडेल पूर्णपणे स्वीकारण्यास नकार दिला, तर पीसीबीसाठी माघारीचा निर्णय सोपा राहणार नाही. पाकने आयसीसीसोबत यजमानपदाच्या करारावर स्वाक्षरी केली, शिवाय अनिवार्यपणे सहभागाविषयीच्या करारावरदेखील सही केली आहे. हस्ताक्षर केल्यानंतरच सहभागी देशांना कमाईचा वाटा दिला जातो. आयसीसीने प्रसारकांसोबत जो करार केला त्यात सर्व सहभागी देश सहभागी होण्याची हमी दिली आहे.

# सय्यद मुश्ताक अली ट्रॉफी उपांत्य फेरीसाठी ४ संघ निश्चित



नवी दिल्ली, दि. १२- सध्या देशांतर्गत क्रिकेटमध्ये टी-२० सामन्यांचा थरार पाहायला मिळत आहे. टीम इंडियासाठी खेळणारे आणि अनेक युवा अनकॅप्ड खेळाडूंनी सय्यद मुश्ताक अली ट्रॉफी २०२४ स्पर्धेत धमाका केला. आता या स्पर्धेतील उपांत्य फेरीसाठी ४ संघ निश्चित झाले आहेत. मुंबई,बडोदा, मध्य प्रदेश आणि दिल्ली या ४ संघांनी सेमी फायनलमध्ये प्रवेश मिळवला आहे. त्यामुळे आता या ४ संघांमध्ये ट्रॉफीसाठी चुरस पाहायला मिळणार आहे.

उपांत्य पूर्व फेरीत मुंबईने विदर्भावर ६ विकेट्सने विजय मिळवला. दिल्लीने उत्तर प्रदेशवर १९ धावांनी मात केली. बडोदाने बंगलावर ४१ धावांनी विजय मिळवला. तर मध्य प्रदेशने सौराष्ट्रवर ६ विकेट्सने शानदार विजय नोंदवला. आता उद्या (शुक्रवार) पासून उपांत्य फेरीतील दोन्ही सामने होणार आहेत. पहिल्या सामन्यात मुंबई विरुद्ध बडोदा आमने-सामने असणार आहेत. या सामन्याला सकाळी ११ वाजता सुरुवात होईल. तर त्यानंतर दुसऱ्या सामन्यात दिल्ली विरुद्ध मध्य प्रदेश यांच्यात अंतिम फेरीत पोहोचण्यासाठी चुरस पाहायला मिळेल. या सामन्याला दुपारी ४ वाजून ३० मिनिटांनी सुरुवात होईल. त्यानंतर रविवार, १५ डिसेंबरला महाअंतिम सामना होईल. हे तिन्ही सामने बंगळुरुतील एम चिन्नास्वामी स्टेडियममध्येच खेळवण्यात येणार आहेत.

## 'बीसीसीआय'चा पाकिस्तानला मोठा धक्का

नवी दिल्ली, दि. १२- २०२५ बाबत अद्याप चित्र स्पष्ट झालेले नाही. या स्पर्धेबाबत भारत आणि पाकिस्तान क्रिकेट बोर्डामध्ये बराच काळ वाद सुरू होता. मात्र, अद्याप त्यावर तोडगा निघालेला नाही. अलीकडेच, काही अहवालांनी असा दावा केला आहे की पुढील वर्षीची चॅम्पियन्स ट्रॉफी हायब्रीड मॉडेलमध्ये आयोजित करण्यावर एकमत झाले आहे, ज्यामुळे भारत दुबईमध्ये आपले सामने खेळेल. त्याचवेळी, हायब्रीड मॉडेलच्या बदल्यात पाकिस्तान क्रिकेट बोर्डाने आयसीसीसमोर अटी ठेवल्या होत्या. त्यानुसार २०२७ पर्यंत आयसीसी स्पर्धांमध्ये हायब्रीड मॉडेलचा वापर केला जावा म्हणजे या कालावधीत, भारतात स्पर्धा असल्यास पाकिस्तानचे सामने तटस्थ ठिकाणी व्हावेत अशी अट होती. भारत पुढील वर्षी ऑक्टोबरमध्ये महिला वनडे विश्वचषक आणि २०२६ मध्ये पुरुषांचा टी-२० विश्वचषक श्रीलंकेसोबत संयुक्तपणे आयोजित करणार आहे. पण आता अशी बातमी समोर आली आहे की, २०२६ चा टी+२० वर्ल्डकप पूर्णपणे हायब्रिड मॉडेलवर खेळवला जाणार नाही.

पाकिस्तानी मीडिया रिपोर्ट्सनुसार, बीसीसीआय टी-२० वर्ल्डकप २०२६ मध्ये पाकिस्तान क्रिकेट टीमचे साखळी फेरीचे सामने श्रीलंकेत आयोजित करण्यास तयार आहेत. परंतु सेमीफायनल आणि फायनल मॅचसाठी पाकिस्तानची अट मान्य केली जाणार नाही. म्हणजेच बीसीसीआयचे उपांत्य आणि अंतिम सामने भारताबाहेर आयोजित केले जाणार नाहीत. अशा परिस्थितीत पाकिस्तान संघ उपांत्य फेरी आणि अंतिम फेरीत पोहोचला तर त्यांना कोणत्याही परिस्थितीत भारत दौरा करावाच लागेल.



**मुंबई : इंडियन स्ट्रीट प्रीमिअर लीग सीझन दोनच्या ट्रॉफी आणि लिलाव समारंभात माजी क्रिकेटपटू सचिन तेंडुलकर, बॉलिवूड अभिनेता सैफ अली खान, करिना कपूर, बीसीसीआय कोषाध्यक्ष आशिष शेलार व अन्य उपस्थित होते.**

## अल्झारी जोसेफला दोन सामन्यांच्या बंदीनंतर आयसीसीने ठोठावला दंड

दुबई, दि. १२- वेस्ट इंडिजचा खेळाडू अलझरी जोसेफ याला अजून एक धक्का बसला आहे. आंतरराष्ट्रीय क्रिकेट परिषदेने (आयसीसी) मंगळवारी वेगवान गोलंदाज अल्झारी जोसेफला मैदानावरील आणखी एका गुन्ह्याबद्दल फटकारले. गेल्या रविवारी सेंट किट्स आणि नेव्हिस येथे बांगलादेश विरुद्ध वेस्ट इंडिजच्या पहिल्या एकदिवसीय सामन्यादरम्यान या वेगवान गोलंदाजाला त्याच्या वागण्याबद्दल दंड आकारण्यात आला आहे.

अल्झारी जोसेफने खेळाडू आणि सपोर्ट स्टाफसाठीच्या आयसीसी आचारसंहितेच्या अनुच्छेद २.३ चे उल्लंघन केल्याचे आढळून आले. आयसीसीच्या निवेदनानुसार, खेळ सुरू होण्यापूर्वी जोसेफने चौथ्या पंच ग्रेगरी ब्रॅथवेटला शिवीगाळ करताना नियमाचे उल्लंघन झाले.

आयसीसीने सांगितले की, 'अल्झारी जोसेफने चौथ्या पंचांशी वाद घालताना आक्षेपार्ह आणि अपमानास्पद भाषा वापरली. अंपायरने अल्झारी जोसेफला स्पाइक्स घालून खेळपट्टीवर पाऊल ठेवू नये असे सांगितले होते. याबाबत बोलत असताना अयोग्य भाषेचा वापर करण्यात आला.

अल्झारी जोसेफला एक डिमेरिट पॉइंट देण्यात आला आहे. मैदानावरील पंच कुमार धर्मसेना आणि लेस्ली रेफर, तिसरे पंच आसिफ याकूब आणि चौथे पंच ग्रेगरी ब्रॅथवेट यांनी अल्झारी जोसेफवर हा आरोप केला आहे. अल्झारी जोसेफचा २४ महिन्यांतील हा दुसरा गुन्हा होता. याआदी अल्झारी जोसेफचा त्याच्याच वेस्ट इंडिज देशाच्या कर्णधार शाई होपशी सुमारे महिनाभरापूर्वी मैदानावर जोरदार वाद झाला होता. यामुळे त्याला २ सामन्यांसाठी निलंबित केले होते.

## पाकचा हारिस रौफ ठरला 'प्लेयर ऑफ द मंथ'



दुबई, दि. १२- पाकिस्तानचा वेगवान गोलंदाज हारिस रौफ नोव्हेंबर महिन्यासाठी 'आयसीसी प्लेयर ऑफ द मंथ' ठरला आहे. या पुरस्काराच्या शर्यतीत त्याने भारताच्या जसप्रीत बुमराह आणि द. आफ्रिकेच्या मार्को जॅनसेन यांना मागे टाकून बाजी मारली. पाकिस्तानचा हा सलग दुसरा पुरस्कार आहे. यापूर्वी ऑक्टोबर महिन्यासाठी पाकिस्तानचा फिरकी गोलंदाज नोमान अलीने हा पुरस्कार जिंकला होता.

आयसीसी दर महिन्याला प्लेयर ऑफ द मंथसाठी तीन खेळाडूंना नामांकित करते. नोव्हेंबर महिन्यात चमकदार कामगिरी करणाऱ्या तीन खेळाडूंमध्ये जसप्रीत बुमराह, हारिस रौफ आणि मार्को जॅनसेन यांचा समावेश होता. बुमराहने ऑस्ट्रेलियाविरुद्ध खेळल्या गेलेल्या पहिल्या कसोटी सामन्यात ८ विकेट घेतल्या होत्या. तर रौफने ऑस्ट्रेलिया आणि झिम्बाब्वेविरुद्धच्या ९ सामन्यात १८ विकेट घेतल्या. त्याच्या गोलंदाजीच्या जोरावर पाकिस्तानला २००२ नंतर ऑस्ट्रेलियन भूमीवर वनडे मालिका जिंकली होती.

**महिलामध्ये इंग्लंडची डॅनी व्याट ठरली मानकरी**



महिला गटातील आयसीसी प्लेयर ऑफ द मंथ हा पुरस्कार इंग्लंडच्या फलंदाज डॅनी व्याट हिला मिळाला. तिने बांगलादेशच्या शर्मीन अख्तर आणि दक्षिण आफ्रिकेच्या नादिन डी क्लर्कला मागे टाकून हा आयसीसी पुरस्कार आपल्या नावावर केला. डॅनीच्या चमकदार कामगिरीच्या जोरावर इंग्लंडने द. आफ्रिकेला टी-२० मालिकेत ३-0ने क्लीन स्विप दिला होता.

# आसीसी क्रमवारीत उलटफेर! रूटला मागे टाकून ब्रुकची अव्वल स्थानी झेप

दुबई, दि. १२- आयसीसीने नवीन कसोटी क्रमवारी जाहीर केली आहे. क्रमवारीत मोठा उलटफेर झाल्याचे पाहायला मिळत आहे. इंग्लंडचा दिग्गज फलंदाज जो रूट गेल्या काही काळापासून अव्वलस्थानी वर्चस्व गाजवत होता. मात्र, त्याने हे स्थान गमावले आहे. त्याचा संघ सहकारी हॅरी ब्रूक आता कसोटीतील टॉपचा फलंदाज बनला आहे.

इंग्लंडचा संघ सध्या न्यूझीलंड दौऱ्यावर असून दोन्ही संघामध्ये ३ सामन्यांची कसोटी मालिका खेळवली जात आहे. या दोन्ही सामन्यांत ब्रूकने चमकदार कामगिरी केली. याच कामगिरीचा फायदा ब्रूकला आयसीसी क्रमवारीत मिळाला आणि तो जो रूटला मागे टाकून पहिल्या स्थानावर पोहोचला. त्याच्या खात्यात ८९८ रेटिंग जमा झाले आहे. दुसऱ्या स्थानावरील जो रूटचे रेटिंग ८९७ आहे. केन विल्यमसन ८१२ रेटिंगसह तिसऱ्या तर भारताचा युवा सलामीवीर यशस्वी जैस्वाल ८११ रेटिंगसह चौथ्या स्थानावर आहे. ट्रॅव्हिस हेड (७८१) पाचव्या स्थानी पोहचला आहे.

आयसीसी कसोटी क्रमवारीत विराट कोहली आणि रोहित शर्मा यांची अवस्था वाईट झाली आहे. टीम इंडियाच्या या दोन्ही दिग्गज फलंदाजांनी ॲडलेड कसोटीत निराशा केली. त्यांच्या बॅटमधून धावा निघाल्या नाही, ज्याचे परिणाम त्यांना भोगावे लागले आहेत. कोहलीला सहा स्थानांचे नुकसान झाले आहे. तो १४वरून थेट २०व्या स्थानावर पोहोचला आहे. रोहित शर्माची तर ३१ व्या स्थानी घसरण झाली आहे. याआधी तो २६ व्या क्रमांकावर होता.

कसोटी फलंदाजीच्या क्रमवारीत अव्वल-१० मध्ये फक्त दोन भारतीय खेळाडू आहेत. यामध्ये युवा सलामीवीर यशस्वी जैस्वाल चौथ्या स्थानावर आहे. त्याचे रेटिंग ८११ आहे. त्याच्या व्यतिरिक्त, यष्टिरक्षक फलंदाज ऋषभ पंतचा समावेश आहे. मात्र, यावेळी तो सहाव्या स्थानावरून नवव्या स्थानावर घसरला आहे. त्याचे रेटिंग ७२४ आहे. श्रीलंकेविरुद्धच्या कसोटी मालिकेत चमकदार कामगिरी करणारा द. आफ्रिकेचा कर्णधार टेम्बा बावुमाही ७व्या स्थानावर पोहोचला आहे.

**बुमराह अव्वल स्थानी कायम**

भारताचा स्टार वेगवान गोलंदाज जसप्रीत बुमराह याने कसोटी गोलंदाजांच्या क्रमवारीत आपले अव्वलस्थान कायम राखले आहे. दुसऱ्या स्थानावर दक्षिण आफ्रिकेचा कागिसो रबाडा असून, दोघांमध्ये ३४ गुणांचे अंतर आहे. भारताविरुद्ध ऑस्ट्रेलियाला विजय मिळवून देण्यात मोलाची भूमिका निभावलेला कर्णधार पॅट कमिन्स याने एका स्थानाने प्रगती करत चौथे स्थान पटकावत, भारताच्या रविचंद्रन अश्विनला पाचव्या स्थानी खेचले. रवींद्र जडेजा सहाव्या क्रमांकावर कायम आहे.

**अष्टपैलूमध्ये जडेजा अव्वल**

अष्टपैलूंमध्ये रवींद्र जडेजा अव्वलस्थानी कायम आहे. ऑस्ट्रेलियाविरुद्धच्या पहिल्या दोन कसोटी सामन्यांत संधी न मिळाल्यानंतरही त्याचे अव्वलस्थान कायम आहे. बांगलादेशच्या मेहिदी हसनने दुसरे स्थान पटकावले असून, तो जडेजाच्या तुलनेत तब्बल १३१ गुणांनी मागे आहे. रविचंद्रन अश्विनने तिसरे स्थान कायम राखले आहे.

# रेल्वे दुरुस्ती विधेयक लोकसभेत मंजूर

नवी दिल्ली, दि. १२- रेल्वे (दुरुस्ती) विधेयक २०२४ लोकसभेत मंजूर झाले. या विधेयकावरील चर्चेला उत्तर देताना रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव यांनी मोदी सरकार रेल्वेचे खासगीकरण होऊ देणार नसल्याचेही स्पष्ट केले. रेल्वे खासगी हातात देण्याची कोणतीही योजना नाही. सर्वसामान्यांसाठी ही सेवा आहे. सरकार ट्रेनमध्ये जनरल डब्यांची संख्या वाढवण्यात व्यस्त आहे, असेही रेल्वेमंत्री म्हणाले.

रेल्वेमंत्री म्हणाले की, या सरकारच्या आधी रेल्वेचे बजेट २५ ते ३० हजार कोटी रुपये होते. मात्र, पंतप्रधान मोदींच्या नेतृत्वाखाली ते २.५२ लाख कोटी रुपये करण्यात आले आहे. रेल्वे बळकट करण्यासाठी १० हजार लोकोमोटिव्ह आणि १५ हजार किमी रेल्वे रुळांवर कवच टाकण्याचे काम सुरू झाले आहे. जे काम विकसित देशांनी २० वर्षांत केले ते काम भारताने पाच वर्षांत केले आहे. कवच प्रणाली लावल्यानंतर चालकाला केबिनमध्ये १० किमीच्या अंतरापर्यंत सिग्नल प्राप्त होईल. तसेच काश्मीर ते कन्याकुमारी यांना जोडणारा रेल्वे प्रकल्प तयार असून त्यावर पुढील चार महिन्यांत रेल्वे धावणार असल्याची माहिती रेल्वेमंत्र्यांनी दिली.

युवकांना रेल्वेमध्ये जास्तीत जास्त संधी उपलब्ध करून देण्यासाठी केंद्र सरकार कटिबध्द असल्याचे सांगून रेल्वेमंत्री म्हणाले की, रेल्वेमध्ये ५८,६४२ रिक्त पदांसाठी भरतीची प्रक्रिया सुरू आहे. विरोधी पक्षांनी भारतीय रेल्वेच्या खासगीकरणाची खोट्या गोष्टी पसरवू नये, रेल्वे सेवेच्या खासगीकरणाचा प्रश्नच उद्भवत नाही, असेही ते म्हणाले. भारतीय रेल्वेचे संपूर्ण लक्ष गरीब आणि मध्यमवर्गीय कुटुंबांवर आहे. १२ हजार नवीन जनरल डबे बनवले जात आहेत. प्रत्येक ट्रेनमध्ये अधिकाधिक जनरल डबे असावेत असा आमचा प्रयत्न आहे, असेही ते म्हणाले.

**४ लाखांहून अधिक लोकांना रोजगार मिळणार**

रेल्वेतील नोकऱ्यांबाबत रेल्वेमंत्री म्हणाले की, यूपीए सरकारच्या काळात ४ लाख ११ हजार लोकांना नोकऱ्या मिळाल्या तर मोदी सरकारच्या काळात ५ लाख २ हजार लोकांना रेल्वेत नोकऱ्या मिळाल्या.

## मुंबई विमानतळावर १२.५ किलो सोने जप्त; तस्करीच्या सिंडिकेटचा पर्दाफाश

मुंबई, दि. १२- येथील आंतरराष्ट्रीय विमानतळावरील फूड कोर्टात कार्यरत असलेल्या विमानतळ कर्मचाऱ्यांच्या सिंडिकेटवर मोठी कारवाई करण्यात आली आहे. विमानतळावर विविध पदांवर काम करणाऱ्या ३ जणांसह ६ जणांच्या अटकेने सोन्याच्या तस्करीत गुंतलेल्या एका मोठ्या सिंडिकेटचा पर्दाफाश झाला आहे.

आंतरराष्ट्रीय ट्रांझिट प्रवाशांकडून सोने मिळवून ते विमानतळाबाहेर पोहोचवण्यामध्ये गुंतल्याची विशिष्ट गुप्त माहितीच्या आधारे ही कारवाई करण्यात आली. गुप्त माहितीवर कारवाई करून, डीआरआय मुंबईच्या अधिकाऱ्यांनी विमानतळावर पाळत ठेवली आणि तस्करीच्या सोन्याच्या अशा दोन खेपा विमानतळाबाहेर वितरित केल्या जात असताना ही कारवाई केली.

## जगदीप धनखड सरकारचे सर्वात मोठे प्रवक्ते : मल्लिकार्जुन खर्गे

नवी दिल्ली, दि. १२- राज्यसभा सभापती जगदीप धनखड यांच्याविरोधात आमचे व्यक्तिगत संघर्ष नाही. मात्र, ते केंद्र सरकारचे मोठे प्रवक्ते आहेत. त्यांच्या वर्तनामुळे आम्हाला त्यांच्याविरोधात अविश्वास ठरावासाठी नोटीस आणावी लागली आहे, अशा शब्दांमध्ये जगदीप धनखड यांच्यावर काँग्रेसचे अध्यक्ष मल्लिकार्जुन खर्गे यांनी बुधवारी हल्लाबोल केला. ते धनखड यांच्याविरोधात अविश्वास प्रस्तावावर बोलत होते. यावेळी मल्लिकार्जुन खर्गे म्हणाले की, राज्यसभेच्या कामकाजात सर्वात मोठा अडथळा आणण्याचे कारण स्वतः राज्यसभा सभापतीच आहेत. त्यांच्या वागण्याने देशाच्या प्रतिष्ठेला धक्का पोहोचला आहे. लोकशाही, राज्यघटना आणि त्यावर बराच विचार केल्यानंतर आम्ही संसदीय लोकशाहीच्या इतिहासात प्रथमच राज्यसभा सभापतींविरोधात अविश्वास ठरावासाठी नोटीस आणली आहे. इंडिया आघाडीने उपराष्ट्रपती जगदीप धनखड यांना पदावरून हटवण्याच्या मागणीसाठी राज्यसभेत प्रस्ताव आणण्यासाठी नोटीस सादर केली. खर्गे म्हणाले की, १९५२ पासून उपराष्ट्रपतींना हटवण्याचा कोणताही ठराव आणला गेला नाही, कारण या पदावर असणारी व्यक्ती निःपक्षपाती आणि राजकारणाच्या पलीकडे वातावरण चालवतात. सभागृहात नियमांपेक्षा राजकारण जास्त आहे.

## छत्तीसगडमध्ये चकमकीत नक्षलवादी ठार

बिजापूर, दि. १२- छत्तीसगडमधील बिजापूरमध्ये सुरक्षा दल आणि नक्षलवाद्यांमध्ये चकमक झाली. यामध्ये एक नक्षली ठार झाला. तर नक्षलवाद्यांनी पेरलेल्या आयईडी स्फोटकांचा स्फोट होऊन दोन जवान जखमी झाले. घटनास्थळावरून पोलिसांनी पिस्तूल, जिवंत आयईडी आणि नक्षली साहित्य जप्त केले आहे.

बिजापूर जिल्ह्यातील गांगलूर पोलीस ठाण्याच्या हद्दीतील मुंगा जंगलात ४० नक्षलवादी लपल्याची माहिती सुरक्षा दलांना मिळाली. बुधवारी सकाळी या परिसरात शोध मोहीम राबविण्यात आली. मुंग्याच्या जंगलात नक्षलवाद्यांनी जवानांवर अंदाधुंद गोळीबार सुरू केला. जवानांनी दिलेल्या प्रत्युत्तर एक नक्षली ठार झाला. घटनास्थळावरून पिस्तूल, जिवंत आयईडी आणि नक्षली साहित्य जप्त करण्यात आले आहे. मुंगा गावाजवळ नक्षलवाद्यांनी जवानांवर आयईडीचा स्फोट केला. त्यामुळे दोन डीआरजी जवान योगेश्वर शोरी आणि मंगलू कुडियम हे जखमी झाले आहेत. त्यांच्यावर जिल्हा रुग्णालयात उपचार सुरू आहेत.

## दिल्ली मद्य घोटाळा प्रकरणी सिसोदियांना 'सर्वोच्च' दिलासा

नवी दिल्ली, दि. १२- दिल्ली मद्य घोटाळा आणि मनी लाँड्रिंग प्रकरणी सर्वोच्च न्यायालयाने बुधवारी आम आदमी पार्टीचे नेते आणि दिल्लीचे माजी उपमुख्यमंत्री मनीष सिसोदिया यांना मोठा दिलासा दिला. त्यांच्या जामिनाच्या अटी शिथिल करण्यात आल्या आहेत.

सिसोदिया यांना सर्वोच्च न्यायालयाने ९ ऑगस्ट २०२४ रोजी दिल्ली दिल्ली मद्य घोटाळा प्रकरणी जामीन मंजूर केला होता. संबंधित दिल्ली मद्य घोटाळा आणि मनी लाँड्रिंग प्रकरणात सिसोदिया यांना जामीन मंजूर केला होता. सर्वोच्च न्यायालयाच्या अटींनुसार, सिसोदिया यांना दर आठवड्याला सोमवार आणि गुरुवारी सकाळी १० ते ११ या वेळेत तपास अधिकाऱ्यासमोर हजेरी लावावी लागत होती.

## मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस दिल्ली दौऱ्यावर; राष्ट्रपतींची घेतली भेट

मुंबई, दि. १२- राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस दिल्ली दौऱ्यावर आहेत. दिल्ली दौऱ्यादरम्यान मुख्यमंत्र्यांनी देशाच्या राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू, उपराष्ट्रपती जगदीप धनकड, केंद्रीय मंत्री नितीन गडकरी, राजनाथ सिंह या मान्यवरांच्या भेटी घेतल्या. देवेंद्र फडणवीस मुख्यमंत्रिपदी विराजमान झाल्यानंतर त्यांचा हा पहिलाच दिल्ली दौरा आहे. सर्व मान्यवरांनी देवेंद्र फडणवीस यांचे अभिनंदन केले आणि त्यांच्या कारकिर्दीसाठी शुभेच्छा दिल्या.

**फडणवीस-बावनकुळे दिल्लीत गडकरींच्या भेटीला**

महाराष्ट्राचे नवनिर्वाचित मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि भाजपचे प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी बुधवारी केंद्रीय महामार्गमंत्री नितीन गडकरी यांच्या दिल्ली येथील निवासस्थानी भेट दिली. विधानसभा निवडणुकीत भाजपला मिळालेल्या मोठ्या यशात गडकरी यांच्या झंझावाती प्रचार सभांचा देखील मोठा वाटा होता. यानिमित्ताने ही कृतज्ञता भेट होती.



राज्यात भाजपच्या नेतृत्वात महायुतीचे सरकार सत्तेत आल्यानंतर ही सदिच्छा भेट असल्याची माहिती दिली. फडणवीस यांनी प्रारंभी गडकरी यांचे पुष्पगुच्छ शाल व श्री गणेशाची प्रतिमा देत स्वागत केले. गडकरी यांनीही त्यांचे अभिनंदन केले व यशस्वी कार्यकाळासाठी शुभेच्छा दिल्या.

## राहुल गांधींच्या आवाहनानंतर लोकसभेचे कामकाज सुरळीत



नवी दिल्ली, दि. १२- संसदेच्या हिवाळी अधिवेशनात सत्ताधारी आणि विरोधक यांच्यात दररोज संघर्ष सुरू आहे. बुधवारी संसदेच्या दोन्ही सभागृहात प्रचंड गदारोळ झाला. विरोधी पक्षाच्यावतीने सभागृह चालू द्यावे म्हणून आणि सरकारवर टीका करण्यासाठी दररोज नवे आणि अनोखे आंदोलन केले जात आहे. याच क्रमात बुधवारी संसद परिसरात काँग्रेस खासदारांनी भाजप खासदारांना तिरंगा आणि गुलाबाची फुले देऊ केली आणि सत्ताधारी पक्षाला संसदेचे कामकाज चालू देण्याचे आवाहन केले. लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी संरक्षणमंत्री राजनाथ सिंह यांना तिरंगा आणि गुलाब देऊ करून संसदेचे कामकाज चालू देण्याचे आवाहन केले. राहुल गांधींच्या आवाहनानंतर बुधवारी लोकसभेचे कामकाज सुरळीत चालले. दरम्यान, मोदी सरकार संसदेचे कामकाज चालू देत नाही, ही अत्यंत लाजिरवाणी बाब आहे, अशी टीका प्रियांका गांधींनी केली.

## मुस्लीम भक्ताकडून ५२ लाखांचा मुकुट अर्पण

**त्रिची : येथील श्रीरंगम रंगानाथर मंदिराला मुस्लीम भक्त झाकीर हुसेन यांनी १६० हून अधिक हिरे जडलेला आणि ५२ लाख रुपये किमतीचा मुकुट अर्पण केला.**





## ईव्हीएमसह विविध मुद्द्यांवर शरद पवार, केजरीवाल, सिंघवी यांची खलबते

नवी दिल्ली, दि. १२- राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाचे अध्यक्ष शरद पवार, आम आदमी पक्षाचे राष्ट्रीय संयोजक अरविंद केजरीवाल, काँग्रेस नेते आणि ज्येष्ठ वकील अभिषेक मनू सिंघवी, काँग्रेस नेते गुरुदीपसिंह सप्पल यांची महत्त्वाची बैठक शरद पवारांच्या दिल्लीतील निवासस्थानी पार पडली.

या बैठकीत महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीच्या निकालाच्या संदर्भाने ईव्हीएम, व्हीव्हीपॅट मशीन तसेच वाढलेले मतदान अशा विविध मुद्द्यांवर चर्चा झाली. या चर्चेनंतर कायदेशीर मार्ग अवलंबत इंडिया आघाडी सर्वोच्च न्यायालयात जाण्याची शक्यता आहे. याबाबतचा निर्णय येत्या शुक्रवारी होऊ शकतो. फेब्रुवारी २०२५ मध्ये दिल्ली विधानसभेच्या निवडणुका होऊ घातल्या आहेत, हे उल्लेखनीय!

विधानसभा निवडणुकीचा निकाल लागला आणि यानंतर महाविकास आघाडीने विविध मुद्द्यांवरून शंका व्यक्त केल्या. त्यानंतर अनेक बैठकाही पार पडल्या. मात्र, या सगळ्या बैठकांमध्ये आतापर्यंतची सगळ्यात मोठी बैठक मंगळवारी दिल्लीत शरद पवारांच्या निवासस्थानी पार पडली. महाराष्ट्रात निकालावर ज्या पध्दतीने शंका व्यक्त केल्या जात आहेत. तसाच प्रकार दिल्लीत होईल, असे अंदाज इंडिया आघाडीच्या राजकीय वर्तुळात बांधले जात आहेत. त्यामुळे या बैठकीला अरविंद केजरीवाल यांचीही उपस्थिती होती. ईव्हीएम, व्हीव्हीपॅट हॅक केले जाऊ शकते का, तंत्रज्ञानाच्या मदतीने ते शक्य आहे का, काही मतदारसंघांमध्ये मतदारांची नावे अचानक वगळण्यात आली, काहींचे मतदारसंघ बदलण्यात आले, या मुद्द्यांवरही या बैठकीत चर्चा झाली. या बैठकीला शरद पवार गटाच्या खासदारांसह महाराष्ट्रातील महाविकास आघाडीचे विविध मतदारसंघातील पराभूत उमेदवार उपस्थित होते.

## पहिला चेंडू खेळणे योग्य नाही, ही एक मोठी जबाबदारी

### पदभार घेताच रिझर्व्ह बँकेच्या गव्हर्नरांचे मोठे विधान

मुंबई, दि.१२- पहिल्या दिवशी पहिला चेंडू खेळणे नेहमीच योग्य नसते. देशाची आर्थिक स्थिती, विकासदर, महागाई या सर्व बाबींचा सखोल अभ्यास करून बँकिंग व्यवस्था मजबूत करणे आणि आर्थिक स्थैर्य राखणे यास प्राधान्य असेल. परंतु, पहिल्याच दिवशी कोणताही मोठा निर्णय घेणे योग्य होणार नाही, असे भारतीय रिझर्व्ह बँकेचे (आरबीआय) नवे गव्हर्नर संजय मल्होत्रा यांनी स्पष्ट केले. पदभार स्वीकारल्यानंतर ते पत्रकार परिषदेत बोलत होते.

ते पुढे म्हणाले की, आरबीआयची जबाबदारी केवळ बँकिंग क्षेत्रापुरती मर्यादित नाही, तर ती देशाच्या आर्थिक विकासातही महत्त्वाची भूमिका बजावते. आरबीआयचे गव्हर्नरपद भूषवणे ही सन्मानाची गोष्ट आहे. आणि एक प्रमुख म्हणून मोठी जबाबदारी आहे. अर्थव्यवस्था आणि चलनविषयक धोरणाशी संबंधित आपले प्राधान्यक्रम असेल, असेही त्यांनी यावेळी सुचित केले.

संजय मल्होत्रा यांनी वयाच्या ५६ व्या वर्षी आरबीआयचे नवे आणि २६ वे गव्हर्नर म्हणून पदभार स्वीकारला आहे. त्यांचा कार्यकाळ ३ वर्षांचा असेल. केंद्र सरकारने सोमवारी सायंकाळी त्यांची रिझर्व्ह बँकेच्या गव्हर्नरपदी नियुक्ती केली. बुधवारी संजय मल्होत्रा यांनी शक्तिकांता दास यांची जागा घेतली आहे.

**संजय मल्होत्रा यांच्यासमोर कोणती आव्हाने?**

जनता आणि सरकार यांच्यासाठी चिंतेचा विषय असलेली महागाई आटोक्यात आणणे हे सर्वात मोठे आव्हान त्यांच्यासमोर आहे. याशिवाय देशाच्या विकासाला चालना देण्यालाही त्यांचे प्राधान्य असेल. बँकिंग व्यवस्थेत पुरेशी तरलता राखणे आणि व्याजदर कमी करण्यासाठी योग्य वेळी योग्य पावले उचलणे या त्यांच्या कार्यकाळातील महत्त्वाच्या बाबी असतील.

## भारत २०३५ पर्यंत स्वत:चे अंतराळ स्थानक उभारणार

नवी दिल्ली, दि. १२- भारत २०३५ पर्यंत स्वत:चे अंतराळ स्थानक उभारणार असून २०४० पर्यंत भारतीय अंतराळवीर चंद्रावर उतरवेल, अशी घोषणा केंद्रीय विज्ञान, तंत्रज्ञान आणि अंतराळ राज्यमंत्री जितेंद्र सिंग यांनी बुधवारी केली.

अंतराळ क्षेत्रात भारत एकापाठोपाठ एक नवीन कामगिरी करत आहे. आता केंद्रीय विज्ञान आणि तंत्रज्ञान राज्यमंत्री डॉ. जितेंद्र सिंह यांनी एक मोठी घोषणा केली आहे. विज्ञान मंत्रालयाच्या कामगिरीवर दिल्लीत पत्रकार परिषदेत बोलताना सिंह यांनी सरकारच्या महत्त्वाकांक्षी अंतराळ उपक्रमांवर प्रकाश टाकला. २०३५ पर्यंत आमचे स्वत:चे अंतराळ स्थानक असणार आहे. अमेरिका आणि एक किंवा दोन इतर देशांनंतर भारताचे अंतरीक्ष स्थानक म्हणून ओळखले जाईल. २०४० पर्यंत चंद्राच्या पृष्ठभागावर एक भारतीय उतरेल, असे त्यांनी सांगितले.

भारताचा पहिला मानवी अंतराळ उड्डाण कार्यक्रम गगनयान मिशन याबद्दल बोलताना सिंग यांनी २०२४ च्या अखेरीस किंवा २०२६ च्या सुरुवातीला गगनयान मोहिमेअंतर्गत पहिला भारतीय अंतराळवीर अंतराळात जाणार असल्याचे सांगितले. त्याचबरोबर, भारताने खोल समुद्र मोहिमेचा भाग म्हणून ६ हजार मीटर पर्यंत खोली शोधून समुद्रतळावर मानव पाठवण्याची योजना आखली असल्याचे सांगितले.

# ‘हॅशटॅग तदेव लग्नम’मधील ‘सगळ्यांचा फोटो’ गाणं प्रदर्शित

सध्या सर्वत्र लग्नसराईचे दिवस सुरु असून वधूवरांसाठी लग्नाचा दिवस खूप खास असतो. हा सुंदर क्षण ते फोटोच्या स्वरूपात कायम जपून ठेवतात. वधूवरांचा हा क्षण अधिक अविस्मरणीय करण्यासाठी ‘हॅशटॅग तदेव लग्नम’ चित्रपटातील ‘सगळ्यांचा फोटो’ हे कमाल गाणं नुकतंच प्रदर्शित करण्यात आलं आहे. या गाण्यात सुबोध भावे आणि तेजश्री प्रधानच्या लग्नाचा बार उडाला असल्याचे दिसत असून त्यांच्या लग्नाचे फोटोज काढले जात आहेत. यात लग्नातील फोटो काढण्यासाठी नातेवाईकांची, मित्रमंडळींची सुरु असलेली लगबग, घाई आणि नव्या जोडप्याचा फोटो काढण्याचा आनंद दिसत आहे. गाण्यात सुबोध भावे आणि तेजश्री प्रधान यांची कमाल केमिस्ट्री दिसत असून ‘कलरफूल’ दिसणारं हे गाणं लग्नसमारंभात सर्रास वाजेल असंच आहे. येत्या २० डिसेंबरच्या शुभ मुहूर्तावर प्रेक्षकांनी या लग्नाला आवर्जून उपस्थिती दर्शवायची आहे.



‘सगळ्यांचा फोटो’ हे गाणं क्षितिज पटवर्धन यांच्या लेखणीतून साकारले असून पंकज पडघण यांनी संगीतबद्ध केले आहे. तर या धमाकेदार गाण्याला नकाश अझीझ आणि आर्या आंबेकर यांचा आवाज लाभला आहे. गाण्यातून प्रेक्षकांना हसवणारी आणि त्यांच्या लग्नाच्या आठवणींमध्ये रममाण करणारी मजेदार झलक पाहायला मिळत आहे.

शुभम फिल्म प्रॉडक्शन प्रस्तुत ‘हॅशटॅग तदेव लग्नम’ चित्रपटाचे लेखन, दिग्दर्शन आनंद दिलीप गोखले यांनी केले असून शेखर विठ्ठल मते निर्माते आहेत. तर या चित्रपटात सुबोध भावे, तेजश्री प्रधान, प्रदीप वेलणकर, मानसी मागिकर, संजय खापरे, आणि शर्मिष्ठा राऊत यांच्या भूमिका आहेत.

चित्रपटाचे दिग्दर्शक आनंद दिलीप गोखले म्हणतात की, हे गाणं पाहाताना, ऐकताना अनेक जण त्यांच्या लग्नाच्या आठवणींना उजाळा देतील आणि ज्यांचे लग्न झाले नाही त्यांच्या लग्नात असा क्षण नक्कीच येईल. या गाण्यात नातेसंबंधांतील गोडवा दाखवण्याचा प्रयत्न आम्ही केला असून नव्या जोडप्याच्या लग्नानंतरच्या मजेदार क्षणांपासून ते नातेवाईकांची उत्सुकता आणि लगबग, हे सगळं प्रेक्षकांना आपलसं वाटेल, याची खात्री आहे. ‘फोटो फोटो’ केवळ एक गाणं नसून, प्रत्येक लग्नात पाहायला मिळणाऱ्या आनंदाचे प्रतिबिंब आहे.

निर्माते शेखर विठ्ठल मते म्हणतात, हे गाणं म्हणजे तुमच्या आमच्या घरातील लग्नाचा व्हिडिओ आहे. खूप सुंदर असे हे गाणं आहे. प्रत्येकाला ठेका धरायला लावणारं हे गाणं आहे. ज्याप्रमाणे संगीतप्रेमींना ‘नकारघंटा’ हे गाणं आवडलं तसंच हे गाणंही निश्चितच आवडेल.

# वरुण धवनच्या बेबी जॉनचा ट्रेलर मोठ्या थाटामाटात प्रदर्शित

बेबी जॉन’ या आगामी हिंदी सिनेमाचा टीझर प्रदर्शित झाल्यापासून या सिनेमाविषयी प्रेक्षकांमध्ये कमालीची उत्सुकता वाढली होती आणि सिनेमाची चर्चा तर जोरदार रंगली असून. नुकतंच वरुण धवन, वामिका गब्बी, प्रेझेंटर अटली आणि निर्माता मुराद खेतानी आणि प्रिया अटली यांनी पुण्यात चाहत्यांच्या उपस्थितीत या सिनेमाचा ट्रेलर प्रदर्शित केल .

कालीस यांच्या दिग्दर्शनाखाली तयार झालेल्या ‘बेबी जॉन’ या सिनेमाच्या टीझरमध्ये बेबी जॉनची झलक पाहायला मिळते. जो ॲक्शन, मनोरंजन, क़ॉमेडी आणि डान्सच्या जबरदस्त दमदार कॉम्बिनेशन आहे. प्रसिद्ध संगीतकार एस. थमन यांनी दिलेले संगीत आणि पार्श्वसंगीत (बीजीएम) ट्रेलरला एका वेगळा उत्साह देते. ज्यामुळे प्रेक्षकांमध्ये हा सिनेमा पाहण्याची उत्सुकता आणखी वाढलेली आहे.

वरुण धवनच्या दमदार एन्ट्रीने प्रेक्षकांना अक्षरशः वेड लावले, तर आधीच लोकप्रिय ठरलेल्या नैन मटक्का गाण्यावर वामिका गब्बीसोबत त्याने केलेल्या भन्नाट डान्स मूव्हजनी कार्यक्रमाची रंगत वाढवली. ट्रेलर लॉन्चचं एकंदरीत वातावरण खूपच उत्साहवर्धक होतं. फॅन्सनी गुड वाइब्स ओनलीच्या घोषणा देत माहोल अजूनच खास बनवला होता.या सिनेमाविषयी व्यक्त होताना वरुण धवन म्हणाला की, ’बेबी जॉन’चा मी एक भाग असल्याचा मला खूप आनंद होत आहे. हा सिनेमा खूपच भावनिक आहे आणि स्टोरीलाईन बद्दल म्हणायचं तर हा सिनेमाच खूप पॉवरफुल जर्नी आहे. यामधील पात्रं साकारण्याचा अनुभव अविस्मरणीय होता. ट्रेलरमध्ये या कथेची तीव्रता आणि झलक पाहायला मिळते. या प्रोजेक्टवर काम करणे खरोखरच खास होते, आणि ही कथा सर्वांसोबत शेअर करण्यासाठी मी खूपच उत्साहित आहे. सिने १ स्टुडिओचे निर्माते मुराद खेतानी म्हणाले, बेबी जॉनच्या माध्यमातून आम्हाला असा एक सिनेमा बनवायचा होता जो ॲक्शन आणि मानवी भावना यांचा सुंदर संगम दाखवेल. बेबी जॉन आमच्या प्रेमाचा आणि मेहनतीचा परिणाम आहे. आज प्रेक्षकांकडून मिळालेल्या प्रतिसादामुळे मला खात्री आहे की हा सिनेमा पाहणाऱ्या प्रत्येकासाठी एक अविस्मरणीय अनुभव असेल. आम्ही हा सिनेमा जगासमोर सादर करण्यासाठी खूप उत्सुक आहोत. अद्वितीय टीमसोबत काम करून तयार झालेल्या या सिनेमाचा आम्हाला खूप अभिमान आहे.

# लग्नानंतरचं स्त्रियांचं आयुष्य उलगडणारी ‘जुळली गाठ गं’

‘सन मराठी’ वाहिनी प्रेक्षकांचं मनोरंजन करण्यात अव्वल ठरली आहे. ‘सन मराठी’ने नेहमीच वेगवेगळ्या कथानक असलेल्या मालिका प्रेक्षकांच्या भेटीस आणल्या आहेत. अशातच सोशल मिडीयावर एका नव्या मालिकेची घोषणा करण्यात आली. लवकरच ‘सन मराठी’वर ‘जुळली गाठ गं’ ही नवी मालिका प्रेक्षकांच्या भेटीस येणार आहे.’जुळली गाठ गं’ या मालिकेचा एक टिझर समोर आला आहे. सोशल मिडीयावर या टीझरला प्रेक्षकांचा चांगला प्रतिसाद मिळत असल्याचं दिसतंय. यामध्ये अभिनेत्री पायल मेमाणे ‘सावी’ ही व्यक्तिरेखा साकारताना पाहायला मिळणार आहे.

मालिकेतील मुख्य भूमिकेबद्दल व्यक्त होत पायल म्हणाली,‘सन मराठी’ या वाहिनीच्या सगळ्याच मालिका प्रेक्षकांना भुरळ घालत आहेत आणि आता मी सुद्धा ‘सन मराठी’वर काम करण्यासाठी खूप उत्सुक आहे. ‘जुळली गाठ गं’ या मालिकेसाठी मला प्रॉडक्शन मधून कॉल आला. ऑडिशन, लुकटेस्ट या पद्धतीनेच माझं सिलेक्शन झालं. या मालिकेत मी सावी हे मुख्य पात्र साकारत आहे. जेव्हा मला सावीच्या स्वभावाबद्दल समजलं तेव्हा मी तिच्या प्रेमातच पडली. सावी ही इन्फ्लुएन्सर आहे. कोल्हापूरमधील सगळ्याच चविष्ट पदार्थांचं ती व्हिडीओ करून युट्युबवर अपलोड करते. बिनधास्त, मनमोकळी, अन्याय सहन न करणारी असा सावीचा स्वभाव आहे.

पुढे ती म्हणाली, मुलींनी स्वतःच्या पायावर उभं राहिलच पाहिजे. प्रत्येक क्षेत्रात त्या पुढे पोहचल्या पाहिजेत. लग्नानंतर मुलींचं आयुष्य बदलतं पण स्त्रियांना बंधनात न अडकवता त्यांना मोकळीक दिली पाहिजे. खेड्यागावात अजूनही लग्नानंतर स्त्रिया फक्त घरातलीच काम करतात पण असं नाही झालं पाहिजे. लग्नानंतर स्त्रियांचं आयुष्य संपत नाही तर खऱ्या अर्थाने सुरु होत. ही मालिका याच विषयावर आधारित आहे. जस सावीला तिच्या घरी जितकी मोकळीक दिली गेलीये तशीच मोकळीक तिला सासरी मिळेल का? सावी सासरच्या मंडळींचे विचार बदलू शकेल का? सावीची गाठ कोणाबरोबर जुळेल या सगळ्या प्रश्नांची उत्तर लवकरच प्रेक्षकांना मिळणार आहेत. मालिकेच कथानक खूप सुंदर आहे. त्यामुळे लगेचच मालिकेसाठी होकार दिला. मी मूळची पुण्याची आहे. माझ्यासाठी कोल्हापुरी भाषा शिकणं हा टास्क होता पण मला प्रॉडक्शनने यासाठी खूप मदत केली.

# सनी देओलचे ‘जाट’ सिनेमातून दमदार पुनरागमन

सनी देओलचे ‘जाट’ सिनेमातून दमदार पुनरागमन होणार आहे. नुकत्याच प्रदर्शित झालेल्या टीझरमध्ये ॲक्शन, थरार आणि स्टंट्सचा धमाका पाहायला मिळणार असल्यामुळे प्रेक्षकांमध्ये उत्कंठा आणखीनच वाढली आहे. सनी देओलच्या ‘जाट’ सिनेमाच्या टीझरमध्ये दमदार ॲक्शन आणि एंटरटेनमेंटने परिपूर्ण टीझर पाहून चाहत्यांची उत्सुकता आणखीनच शिगेला पोहोचली आहे.




अभिनेता सनी देओलच्या आगामी ॲक्शन सिनेमा जाटचा बहुप्रतिक्षित टीझर नुकताच प्रदर्शित झाला आहे, ज्याने चाहत्यांना अक्षरशः थक्क करून टाकले आहे. या सिनेमाच्या निमित्ताने ॲक्शन सुपरस्टार परत आला आहे असं नक्कीच म्हणावं लागेल. काही दिवसांपूर्वी ब्लॉकबस्टर पुष्पा २ च्या विशेष प्रीमियर दरम्यान जाट चा टीझर प्रदर्शित झाला. १२,५०० स्क्रीनवर हा टीझर दाखवण्यात आला आणि ही भारतीय सिनेमाच्या इतिहासातील सर्वात मोठी बाब आहे.

जेव्हा या सिनेमाचा टीझर प्रदर्शित झाला तेव्हा या प्रेक्षकांची एनर्जी अफलातून होती. सनी देओलच्या दमदार अभिनयाने आणि थरारक ॲक्शन सीन्सला प्रेक्षकांनी जोरदार शिट्ट्या आणि टाळ्यांच्या माध्यमातून त्यांचा उत्साह आणि प्रतिसाद दाखवला. टीझरने चाहत्यांना खुर्चीला खिळवून ठेवले, यावरुन हे पुन्हा सिद्ध झाले की सनी देओल भारतीय सिनेसृष्टीतील खरा ॲक्शन हिरो आहे.

दूरदृष्टी असलेल्या गोपीचंद मालिनेनी यांच्या दिग्दर्शनाखाली तयार झालेला आणि मायथ्री मूवी मेकर्स व पीपल मीडिया फॅक्टरी या दोन दमदार निर्मात्यांनी निर्मिती केलेला ‘जाट’ हा सिनेमा ॲक्शन जॉनरला एका नव्या उंचीवर घेऊन जाणार हे नक्की. रणदीप हुड्डा, विनीत कुमार सिंह, सैयामी खेर आणि रेजिना कैसंड्रा यांसारख्या प्रतिभावान कलाकारांच्या जबरदस्त अभिनयासोबतच हा सिनेमा प्रेक्षकांना एका दमदार आणि रोमांचक कथानकाचा अनुभव देणार आहे.

‘जाट’ या सिनेमाची संगीताची जबाबदारी थमन एस यांनी घेतली आहे, तर सिनेमॅटोग्राफी ऋषी पंजाबी यांनी सांभाळली आहे. नवीन नूली यांनी एडिटींगचे काम अतिशय चोख केले असून, अविनाश कोला यांनी प्रोडक्शन डिझाइनची जबाबदारी यशस्वीपणे पार पाडली आहे. ॲक्शन सीनसाठी अनल अरासु, राम-लक्ष्मण आणि वेंकट यांच्या टीमने उत्कृष्ट स्टंट आणि रोमांचक ॲक्शन सिक्वेन्स तयार केले आहेत, जे प्रेक्षकांना शेवटपर्यंत खिळवून ठेवतील.

टीझर म्हणजे ‘जाट’ या सिनेमातील भव्य दृश्यांची केवळ एक झलक आहे. सिनेमाच्या रिलीजसाठी काउंटडाउन सुरू झाल्यामुळे, चाहते आता एप्रिल २०२५ मध्ये सिनेमागृहात हा रोमांचक प्रवास अनुभवण्याची प्रतिक्षा नक्कीच करत असतील.

# दीपिकाने पहिल्यांदाच घेतला मॉम ड्युटीतून ब्रेक

दीपिका पदुकोण आणि रणवीर सिंग या वर्षी सप्टेंबरमध्ये आईवडील बनले. त्यांच्या मुलीचे नाव दुआ असे आहे. आपल्या मुलीला जन्म दिल्यानंतर दीपिका प्रसिद्धीपासून दूर गेली आहे आणि पूर्णवेळ आईची कर्तव्ये पार पाडत आहे. पण तिच्या मुलीच्या जन्मानंतर दोन महिन्यांनी, दीपिका नुकतीच दिलजीत दोसांझच्या बंगळुरू कॉन्सर्टमध्ये गेली आहे, जिथे तिने डान्स केला आणि मजा केली. कॉन्सर्टमधील दीपिकाचे अनेक व्हिडिओ सध्या सोशल मीडियावर व्हायरल झाले आहेत.



दीपिका पदुकोणने तिच्या मुलीच्या जन्मापासून कामातून ब्रेक घेतला आहे. या ब्रेकदरम्यान तिने आई झाल्यानंतर पहिल्यांदाच स्वत:साठी वेळ काढला आहे. दीपिका शुक्रवारी बेंगळुरूमध्ये दिलजीत दोसांझच्या कॉन्सर्टमध्ये सहभागी झाली होती. यादरम्यान दिलजीतने दीपिकाच्या ब्रँडची जाहिरात केली आणि तिचं यासाठी खूप कौतुकही केलं. इतकंच नाही तर दोघेही स्टेजवर एकत्र नाचताना दिसले. तिच्या बाळंतपणानंतरच्या या पहिल्याच पब्लिक अपीरियन्समुळे तिचे चाहते भलतेच खुश आहेत.

दिलजीतने लव्हर हे गाणे गायले असून दीपिका त्यावर परफॉर्म करताना दिसली. याशिवाय, कॉन्सर्टच्या आणखी एका व्हिडिओमध्ये, दीपिका करीना कपूर खान स्टारर ‘क्रू’ मधील ‘चोली के पीछे’ गाण्यावर नृत्य करताना दिसली. हे गाणं दिलजीतने प्रेक्षकांसाठी थोड्या नव्या ढंगात आणलं आहे.


स्टेजवर पोहोचल्यानंतर दीपिकाने पंजाबी असलेल्या गायकाला म्हणजेच दिलजीतला काही कन्नड ओळीही समजावून सांगितल्या.

दिलजीतने या क्षणाचा व्हिडिओ सोशल मिडियावर शेअर केला आहे. त्याने त्यात लिहिले आहे की, क्वीन दीपिका पदुकोण,दिल लुमिनाटी टूर इन बंगळुरू. दीपिकानेही यावर ‘या आठवणींसाठी धन्यवाद’ अशी सुंदर प्रतिक्रिया दिली आहे.

मुलीच्या जन्मानंतर दीपिका पहिल्यांदाच सार्वजनिक ठिकाणी दिसली आहे. या कॉन्सर्टमध्ये दीपिकाने निळ्या डेनिम पॅन्ट आणि स्नीकर्ससह पांढरा स्वेटशर्ट परिधान केला होता आणि नेहमीप्रमाणेच ती खूपच सुंदर दिसत होती. आई झाल्यानंतर दीपिकाची झलक पाहून चाहते खूश झाले असून सोशल मीडियावर तिचे फोटो आणि व्हिडीओ पाहून त्यावर प्रेमाचा वर्षाव करत आहेत.

# ‘अग्नी’मधील सई प्रेक्षकांना भावली

बॅक टू बॅक प्रोजेक्ट्स आणि दर्जेदार भूमिका साकारणारी सुपरस्टार सई ताम्हणकर सध्या बॉलिवूड गजवताना दिसतेय. नुकत्याच प्रदर्शित झालेल्या अग्नी मधून हे पुन्हा एकदा सईने तिच्या अभिनयाची छाप पाडली. २०२४ मध्ये दमदार काम करणारी आणि कमालीच्या भूमिका साकारणारी सई पुन्हा एकदा प्रेक्षकांना मोहित करून गेली आहे.






२०२४ हे वर्ष सईसाठी अनेक गोष्टींसाठी खास ठरलं आणि यात तिच्या वैविध्यपूर्ण भूमिका तर होत्याच , पण सोबतीने अनेक आव्हानं पेलत तिने बॉलिवुडमध्ये स्वतःच्या अभिनयाची जादू दाखवली आहे. मिमी, भक्षक आणि आता अग्नी सईच्या वेगळ्या धाटणीच्या भूमिका या कायम लक्षवेधी ठरतात.

अग्नी मधली रुख्मिणी प्रेक्षकांना भावली तर खरंच , पण बॉलिवूडमधल्या बड्या कलाकारांच्या सोबतीने तिने तिची भूमिका चोख पार पाडली आहे. एक गृहिणी असलेली रुख्मिणी खंबीर पाठिंबा देणारी बायको, बहीण आणि आई आहे हे तिने यातून सिद्ध केलं आहे. सईच्या भूमिकेचे सर्वत्र कौतुक होत असताना बॉलिवूड सोबतीने मराठी कलाकारांनी देखील तिच्या भूमिकेच कौतुक केलं आहे. दिग्गज दिग्दर्शक हंसल मेहतापासून नवाज उद्दिन सिद्दीकी, नोरा फतेह ते मराठी मधल्या अनेक कलाकारांनी ‘अग्नी’ला वाहवा दिली आहे.

येणाऱ्या काळात सई अनेक बॉलिवूड प्रोजेक्ट्समध्ये दिसणार असून ग्राउंड झीरो, डब्बा कार्टेल हे तिचे आगामी प्रोजेक्ट आहेत.

# थंडीत करा डाळींचे गरमागरम सूप

थंडी म्हटली की सतत काहीतरी गरमागरम घ्यावेसे वाटते. अशावेळी चहा किंवा कॉफी घेण्यापेक्षा शरीराला ऊब मिळेल आणि ताकद वाढण्यासही मदत होईल असे सूप घेतले तर? भाज्यांचे सूप आपण नेहमीच घेतो, पण आज आपण डाळींचे सूप पाहणार आहोत.

डाळींमध्ये मोठ्या प्रमाणात प्रोटीन्स असल्याने हे सूप आरोग्यासाठी अतिशय फायदेशीर असते. त्याला लसूण, जीरे यांसारख्या गोष्टींचा तडका दिल्याने त्याची चवही अतिशय छान लागते. लहान मुलांपासून ते वयस्कर व्यक्तींपर्यंत सगळ्यांना चालणारे आणि ताकद देणारे हे सूप कसे करायचे ते पाहूया. झटपट होत असल्याने करायलाही सोपे आणि घशाला आराम देणारे हे सूप तुम्ही नक्की ट्राय करुन पाहा.



साहित्य

१. मूग डाळ - अर्धी वाटी
२. तूर डाळ - अर्धी वाटी
३. मसूर डाळ - अर्धी वाटी
४. लसूण - ७ ते ८ पाकळ्या
५. जीरे - अर्धा चमचा
६. कडीपत्ता - ६ ते ७ पाने
७. लाल किंवा हिरवी मिरची - १
८. मीठ - चवीनुसार
९. लिंबाचा रस - अर्धा चमचा
१०. साखर - अर्धा चमचा
११. तेल - १ चमचा
१२. हिंग - हळद - फोडणीपुरती
१३. कोथिंबीर - अर्धी वाटी

कृती -

१. सगळ्या डाळी स्वच्छ धुवून त्यात बसेल तेवढे पाणी घालून कुकरला शिजवायला लावाव्यात. साधारण ३ ते ४ शिट्ट्या घ्याव्यात.

२. झाकण पडल्यानंतर या डाळी चांगल्या हाटून घेऊन त्यामध्ये जवळपास दुप्पट पाणी घालावे.

३. यामध्ये साखर, मीठ, लिंबाचा रस घालून हे मिश्रण चांगले हाटून घ्यावे.

४. कढईमध्ये तेल घालून त्यामध्ये जीरे, हिंग, हळद घालावे. फोडणी तडतडली की त्यामध्ये मिरची, कडीपत्ता आणि लसणाच्या पाकळ्या घालाव्यात.

५. ही फोडणी डाळींच्या मिश्रणामध्ये घालून त्यावर वरुन कोथिंबीर घालावी. आवश्यकतेनुसार पाणी घालून हे मिश्रण गॅसवर पुन्हा चांगले उकळावे.

६. तूप घालून हे डाळींचे सूप गरमागरम प्यावे.

# आता खा मॅगी मंचूरियन! बघा झटपट रेसिपी

मॅगीसोबत नेहमीच वेगवेगळे प्रयोग केले जातात. कधी मॅगीचं आईस्क्रिम बनवलं जातं तर कधी मॅगीचं सारण करून त्याचे सामोसे तळले जातात.

आता असाच एक मॅगीसोबत केलेला प्रयोग गाजतो आहे. या रेसिपीमध्ये मॅगीचे मन्चुरियन करून दाखवले आहेत. रेसिपी पाहून तर हा पदार्थ चवदार आणि खमंग असावा, असं वाटतं. काही जणांना हा प्रयोग आवडला आहे तर काही जणांनी असे प्रयोग करायला मॅगीचीच निवड का करता, म्हणून नाराजी व्यक्त केली आहे.



कसे करायचे मॅगी मन्चुरियन?

साहित्य

२ कप शिजवलेल्या नूडल्स

सिमला मिरची, गाजर, कांदा, कोबी अशा बारीक चिरलेल्या भाज्या २ कप

चायनिज सॉसेस

१ टीस्पून व्हिनेगर

मॅगी मसाला,आलं- लसूण- मिरचीची पेस्ट,मिरे पूड,तळण्यासाठी तेल,कॉर्नफ्लॉवर,चवीनुसार मीठ

रेसिपी

१. सगळ्यात आधी नूडल्स मसाला न टाकता शिजवून घ्या.

२. उकडलेल्या नूडल्स एका भांड्यात काढा. त्यात चिरलेल्या सगळ्या भाज्या आणि वरील पदार्थ घाला.

३. सगळं मिश्रण एकत्र करून व्यवस्थित कालवून घ्या आणि त्याचे लहान लहान गोळे बनवा.

४. कढईमध्ये तेल तापवून घ्या आणि त्यात मन्चुरियन तळून घ्या.

५. ग्रेव्ही तयार करण्यासाठी एका कढईमध्ये थोडं तेल घाला. तेल तापलं की त्यात कांदा आणि सिमला मिरचीचे चौकोनी आकाराचे काप टाकून परतून घ्या.

६. नंतर त्यात आलं- लसूण पेस्ट आणि टोमॅटो सॉस, चिली सॉस, शेजवान सॉस असे तुमच्या आवडीनुसार चायनीज सॉस घाला.

७. थोडं पाणी घाला आणि कॉर्नफ्लेवरची प्युरी टाकून तुम्हाला पाहिजे तसं ते घट्ट करून घ्या.

८. आता या ग्रेव्हीमध्ये तळलेले मन्चुरियन टाका. आणि गरमागरम मॅगी मन्चुरियन सर्व्ह करा.

# वजन कमी करण्यासाठी सूप आहेत फायदेशीर

सध्याची जीवनशैली ही खूप धावपळीची झाली आहे. कामाच्या गडबडीत खाण्या पिण्याच्या वेळा सुद्धा बदलल्या गेल्या आहेत. किंवा काही वेळा घरच्या जेवणाऐवजी बाहेरचे अन्न पदार्थ खावे लागतात. आणि सतत एक अजागी बसून काम केल्याने वजन सुद्धा वाढत. आपल्यापैकी अनेकजण वजन कमी करण्यासाठी जेवणाआधी सूप पितात. असं म्हणतात की, वजन कमी होण्यासाठी मदत याची मदत होती.



वजन कमी करण्यासाठी करा 'या' सूपचे सेवन

कोबी सूप

हिवाळ्यामध्ये कोबी जास्त प्रमाणात खाल्ला जातो. हे सूप प्यायल्याने पचन क्रिया मजबूत व्हायला मदत होते. सोबतच यामुळे शरीराची सूज कमी व्हायला देखील मदत होते.

दूधी सूप

दुधीमध्ये भरपूर कॅलरीज असतात. सोबतच यामध्ये कार्ब्स देखील कमी असतात. त्यामुळे याचे सेवन केल्याने वजन कमी व्हायला मदत होते.

पालक सूप

पालकमध्ये अनेक कॅलरीज, प्रोटीन, फायबर असतात. हे वजन कमी करण्यासाठी अत्यंत फायदेशीर आहे.

बीट सूप

बीटाचे सेवन केल्याने ते शरीरातील हीमोग्लोबिनचे प्रमाण वाढवण्यास मदत मिळते.

ब्रोकली सूप

ब्रोकलीमध्ये अनेक प्रोटीन, कॅल्शियम, अँटी-कॅन्सर आणि अँटी-इंफ्लेमेंटरी सारखे गुण असतात. हे वजन कमी करण्यासाठी फायदेशीर आहे.

# लग्नासाठी फुटवेअर खरेदी करताय?

तुळशी विवाह झाल्यानंतर अनेक जण आपल्या जोडीदारासह लग्नगाठ बांधतात. सध्या लग्नाचा सिझन सुरू आहे. त्याकरिता सर्वत्र, खरेदीची लगबग सुरू आहे. खरेदी करताना कपड्यांइतकीच महत्त्वाची गोष्ट असते ती म्हणजे फुटवेअर.

लग्नात पेहराव, दागिने, मेकअप या गोष्टींसोबतच वधूच्या लूकमध्ये चार चांद लावतात ते म्हणजे फुटवेअर. पण लग्नासाठीचे खास फुटवेअर खरेदी करताना काळजी घेणं अतिशय गरजेचं आहे. लग्नासाठी फुटवेअर खरेदी करत असाल तर या टिप्स जरुर विचारात घ्या.

खरेदीपुर्वी विचार

सगळ्यात पहिल्यांदा आपण लग्नाच्या विधींसाठी खरेदी करत असलेल्या पादत्राणांच्या निवडीबाबत विचार करा. प्रत्येक विधीसाठी कोणत्या पद्धतीचं, कलरचं पादत्राण निवडाल याबाबत शांतपणे विचार करा. पादत्राण कधीही शेवटी खरेदी करा, आपल्या पोशाखाला शोभेल असे खरेदी करा.



लेहंग्याचा रंग विचारात घ्या

लग्नाच्या फुटवेअरमध्ये अनेकदा गोल्डन वर्क असलेल्या फुटवेअरलाच प्राधान्य दिलं जातं. पण शक्यतो असं फुटवेअर निवडा ज्याने तुमचा वेडिंग लूक कंप्लीट होईल आणि ते लेहंग्याला, साडीला मॅचिंग असेल.

कंफर्टही महत्त्वाचे

लग्नात स्टायलिश दिसणं महत्त्वाचं आहेच. पण त्याहीपेक्षा महत्त्वाचं आहे ते त्या पेहरावात कंफर्टेबल असणं. लग्नाचा पेहराव हेवी वर्क वाला असतो. त्यात ज्वेलरी आणि मेक अपचीही भर असते. अशावेळी फुटवेअर कंफर्टेबल नसेल तर पावलांना अतिशय त्रास होण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे स्टाईलसोबत कंफर्टलाही प्राधान्य द्या.

लेहंग्याची उंची जरुर विचारात घ्या

ब्रायडल लेहंगे हे अनेकदा हेवी असतात. अशावेळी लेहंग्याची उंची, वजन या बाबी जरुर विचारात घ्या. फुटवेअरवर फार हेवी वर्क नसेल तर त्यावर हेवी बॉर्डरचा लेहंगा खुलून दिसेल. याउलट फुटवेअर हेवी वर्कवालं असेल तर त्यावर बारीक बॉर्डर असलेला लेहंगा निवडा. लग्नासाठी प्लॅटफॉर्म हिल्स, किटन हिल्स, वेजेस, मोजडी, कोल्हापुरी चप्पल हे फूटवेअर ऑलटाईम फेव्हरेट आहेत.

डबल जोडी खरेदी करा

जर आपण बाजारात लग्नासाठी पादत्राणे खरेदी करणार असाल तर नक्कीच आणखी एक जोडी पादत्राणे खरेदी करा. कारण कधीकधी पादत्राणांमध्ये गडबड झाल्यास, आपण दुसरे पादत्राणे वापरू शकता आणि तुमचा विशेष दिवस कोणत्याही अडचणींशिवाय आनंदात पार पडेल.

# वेटलॉस करायचाय तर पोहे खा

सकाळी नाश्त्याला दुसरं काहीच सूचलं नाही तर पोहे केले जातात. पोहे बळजबरीनं नव्हे तर आवडीनं खाल्ले जातात. पण अनेकांना रोज पोहे खाण्याची भीती वाटते. पोहे खाऊन वजन वाढलं तर.. पोह्यांबद्दल अशी भीती बाळगर्णाय़ांसाठी एक गूड न्यूज आहे.

पोह्यांनी वजन वाढत नाही तर उलट वजन कमी करण्यासाठी पोहे खाण्याचा सल्ला आहार तज्ज्ञ देतात. आहार तज्ज्ञांनी पोह्यांमधलं वेटलॉस सीक्रेट सांगितलं आहे.



पोहे का खावेत?

पोषण तज्ज्ञ सीमा सिंह यांनी पोह्यांबद्दलचा हा गैरसमज दूर करुन वजन कमी करण्यासाठी पोहे कसे खावेत, किती खावेत याबद्दल सविस्तर माहिती सांगितली आहे. सीमा सिंह सांगतात की, पोह्यांमुळे शरीराला आवश्यक पोषणमुल्यं मिळतात. वजन कमी करायचं असल्यास अथवा वजन नियंत्रित करण्यासाठी सकाळच्या आहारात अवश्य पोहे खायला हवेत. हेल्दी वेटलॉससाठी नाश्त्याला पोहे हा उत्तम पर्याय आहे. पोह्यातून शरीराला आवश्यक कर्बोदकं मिळतात. तसेच पोह्यातून लोह, फायबर, जीवसत्व आणि ण्टिऑक्सिडण्टसही मिळतात. पोह्यामध्ये फायबरचं प्रमाण चांगलं असतं. त्यामुळे पोहे खाल्ल्यानं पोट भरपूर वेळ भरलेलं राहातं. पोहे खाल्ल्यानं फसवी भूक लागून अरबट चरबट खाणं टाळलं जातं. पोह्यातील या गुणधर्मामुळे पोहे खाल्ल्यानं वजन कमी होतं/ नियंत्रित ठेवता येतं.

सीमा सिंह सांगतात की, पोह्यांमध्ये कॅलरीजचं प्रमाण कमी आणि कर्बोदकांचं जास्त असतं. पोह्यात लोह, क आणि अ जीवनसत्व असतं. १०० ग्रॅम पोह्यांमध्ये ६७.६ मायक्रोग्रॅम अ जीवनसत्व, १.९ मिलीग्रॅम क जीवनसत्व, ६.१ मिलीग्रॅम लोह आणि ७९.७ मिलीग्रॅम फॉस्फरस असतं. पोहे ज्या पध्दतीनं तयार केले जातात त्यामुळे ते आरोग्यास फायदेशीर होतात. पोह्यांमधलं पोषणमुल्यं आणखी वाढण्यासाठी पोहे करताना त्यात विविध भाज्या घालायला हव्यात.

पोहे खाल्ल्यानं शरीराला पोषणमुल्यं मिळण्यासोबतच पचन व्यवस्थाही सुधारते. पोह्यांमध्ये फायबरचं प्रमाण जास्त असल्यानं पोह्यांमुळे पोट साफ राहातं. तसेच पोह्यांमध्ये ग्लुटेन नसतं त्यामुळे पोहे खाऊन पचनाच्या आणि वजन वाढीच्या समस्या निर्माण होत नाही.

पोहे किती खावेत?

वजन कमी करण्यासाठी आणि नियंत्रित ठेवण्यासाठी पोहे खाण्याचं विशिष्ट प्रमाण आहे. नाश्त्याला डिश भरुन पोहे न खाता पाव डिश पोहे खावेत. पोहे सकाळी नाश्त्याला खाणं ही आदर्श पध्दत असली तरी दिवसातल्या कोणत्याही वेळी प्रमाण सांभाळून ते खाल्ले तरी चालतात.संध्याकाळी खूप भूक लागते. तेव्हा इतर काही खाण्यापेक्षा पोहे खाल्ले तरी चालतं. दुपारच्या जेवणात किंवा रात्रीच्या जेवणात एखाद्या पदार्थाला पर्याय म्हणून पोहे खाता येतात. पोह्यांमध्ये प्रथिनांचं प्रमाण कमी असतं त्यामुळे पोहे खाताना त्यात भाज्या अवश्य घालाव्यात.

# बटाट्या पासून बनवा झटपट ईडली

थालीपीठ , पराठा, सँडविच खाऊन जर तुम्हांला कंटाळा आला असेल तर बटाट्याची ईडली नक्की ट्राय करा



नाश्त्यामध्ये रोज काय बनवायचं हा प्रश्न महिला वर्गाला नेहमी सतावत असतो. त्यातच पोहे, उपमा, ईडली, डोसा, थालीपीठ , पराठा, सँडविच खाऊन जर तुम्हांला कंटाळा आला असेल तर बटाट्याची ईडली नक्की ट्राय करा. बनवण्यास झटपट आणि टेस्टी असलेली ही ईडली तब्येतीसाठीही फायदेशीर आहे.

साहीत्य- १ उकडलेला बटाटा, १ कप रवा, १ टीस्पून चन्याची डाळ, १/२ कप दही, १/२ टीस्पून मोहरी, १/२ टीस्पून जीरे एक चिमूट हींग, ७-८ कडी पत्त्याची पानं, २ टेबलस्पून बारीक चिरलेली कोथिंबीर, १/२ टीस्पून ईनो, २ टेबलस्पून तेल और नमक

कृती-सर्वप्रथम उकडलेल्या बटाट्याची साले काढून घ्या. नंतर ब्लेंडरमध्ये १/४ कप पाणी टाकून त्यात बटाटे टाकावे. त्याची स्मूदी बनवावी. नंतर एका फ्राय पॅनमध्ये जीरे मोहरी हींग, चना डाळ, कडीपत्ता टाकून फ्राय करावे. नंतर मंद आचेवर या मसाल्यात रवा टाकून परतून घ्यावा. हे मिश्रण एका बाऊलमध्ये घ्यावे. रवा थंड झाल्यावर त्यात बटाट्याची स्मूदी, दही, कोथिंबीर, चवीनुसार मीठ, पाणी, ईनो टाकावे. ईडली पात्रात टाकून त्याच्या ईडल्या बनवाव्यात. गरमगरम ईडली हिरव्या चटणीबरोबर .खाण्यास द्यावी